सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २४ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पाकिस्तानची गुरगुर सुरूच; तुम्ही पाणी बंद कराल तर आम्ही तुमचा श्वास बंद करू, भारताला धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४लाहोर**

पहलगाम हल्लूयानंतर भारताने पाकिस्तानशी असलेला सिंधू जलवाटप करार निलंबित करण्याची घोषणा केली. पाकिस्तानातील सिंचनासह शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या हा जलस्रोतच थांबणार असल्याने पाकिस्तान भेदरला असून, शुक्रवारी या देशाच्या लष्कराचे प्रवक्ते लेफ्ट. जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी भारताला थेट धमकी दिली.

'तुम्ही आमचे पाणी बंद कराल तर, आम्ही तुमचे श्वास बंद करू' अशा शब्दांत या प्रवक्त्याने गरळ ओकली. येथील एका विद्यापीठात आयोजित समारंभात बोलताना चौधरी यांनी ही धमकी दिली. पहलगाम दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने तातडीने पाकिस्तानशी असलेला सिंधू जलवाटप करार स्थगित केला होता. जोवर पाकिस्तान



दहशतवादी कारवायांना पाठिंबा देणे बंद करीत नाही तोवर हा करार स्थगित राहाणार आहे.

पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ या पक्षाचे खासदार सय्यद अली जफर यांनी सिंधू जल संकटाला 'वॉटर बॉम्ब' असे संबोधले आहे. त्यांनी सरकारकडे मागणी केली आहे की, या गंभीर संकटातून बाहेर पडण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत. या जलसंकटावर आपण आताच तोडगा काढला नाही तर पाकिस्तानी नागरिक उपासमारीने मरतील, असे ते म्हणाले.

## लाडकी बहिण योजनेमुळं सरकारची दमछाक
## इतर विभागांचा निधी वळवला, दुसऱ्या योजनांना घरघर?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना (ड्रवज्ञळ इरहळप धेक्षरपर) सुरू करण्यात आली. या योजनेमुळे महायुती सरकारला घवघवीत यशही मिळालं. मात्र आता सरकारची दमछाक होते की काय असा प्रश्न समोर येत आहे. कारण इतर विभागांचा निधी तर वळवला जातोय. त्यासोबतच अनेक योजनांवरही या योजनेचा परिणाम होताना पाहायला मिळत आहे.

**इतर विभागांचा निधीही आता लाडक्या बहिणीकडे वळवला जातोय**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विधानसभेत गेम चेंजर ठरली होती. मात्र आता या योजनेमुळे इतर योजनांना घरघर लागली की काय? असा प्रश्न समोर येत आहे. दलित आदिवासी समाजासाठी सुरु केलेल्या विभागाचा निधीही आता लाडक्या बहिणीकडे वळवताना पाहायला मिळतोय. शुक्रवारी राज्य सरकारने शासन निर्णय काढून आदिवासी विभागाचा ३३५ कोटी रुपयांचा निधी लाडक्या बहिणीसाठी महिला व बालविकास विभागाला वर्ग केलाय. या आधीही आदिवासी विभागाचा ३३५ कोटी आणि सामाजिक न्याय विभागाचा ४१० कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला होता. त्यामुळे विरोधकांकडून मोठया प्रमाणावर टिका होताना पाहायला मिळत आहे.



लाडक्या बहिणीसाठी या दोन विभागांचा फक्त निधी वळवला नाही तर इतर विभागांच्या योजनांवरती ही मोठा परिणाम झालेला पाहायला मिळत आहे. गोपिनाथ मुंडे अपघात विमा योजना, आनंदाचा शिधा आणि शिवभोजन थाळीलाही फटका बसला आहे. गोपिनाथ मुंडे अपघात विमा या योजनेत बसणाऱ्या जवळपास ३ हजार शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झालेला आहे. मात्र त्यांना अद्यापपर्यंत मदत मिळाली नाही. त्यांना मदत मिळावी म्हणुन कृषी विभागाने ६० कोटी ३३ लाख रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवला आहे. मात्र अद्याप मदत मिळाली नाही. तर लाडकी बहिण योजना सुरु झाल्यानंतर आनंदाचा शिधाच अद्याप वाटप झालेला नाही. शिवभोजन थाळीची संख्या सध्या राज्यात दररोज २ लाख आहे त्याची संख्या वाढवावी असा प्रस्ताव असतानाही त्यात वाढ करण्यात आलेली नाही.यावरती प्रतिक्रीया देताना स्वतः महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक प्रकारे मान्य केलेला आहे की आदिवासी विभाग आणि सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळवता येत नाही. पण त्यांच्याच सरकारने शासन निर्णय काढीत धडधडीत हा निधी वळवलेला पाहायला मिळतोय. आदिवासी विभागाचा निधी इतरत्र गेला असता तरी या विभागाला निधी कमी पडू देणार नाही अस खुद्द आदिवासी मंत्री अशोक उईके यांनी म्हटलं आहे.लाडकी बहीण योजना ही महायुतीसाठी गेम चेंजर ठरली असली तरी आता पांढरा हत्ती ठरु लागलेली आहे. त्यामुळं इतर विभागातील निधी वळवायला सुरुवात झालेली आहे. इतर मंत्र्यांनीही उघडपणे नाराजी व्यक्त करायला सुरुवात केली आहे. त्यामुळं लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारच्या गळ्यातले लोढणं बनलय का? असा प्रश्न समोर येत आहे.

## रुग्णांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचं पाऊल; क्यूआर कोडवरुन कळणार डॉक्टरांची संपूर्ण माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

राज्यात अनेक ठिकाणी बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट पाहायला मिळतो, विशेषतः ग्रामीण भागात अशा डॉक्टरांचं प्रमाण अधिक असल्याची प्रकरणं समोर आली आहेत. काही चुकीच्या लोकांमुळं डॉक्टरांचा पेशा बदनाम होत असल्याचं निदर्शनास आलंय. त्यावर उपाय म्हणून आता प्रत्येक डॉक्टरांना 'क्युआर कोड' मिळणार आहे. महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलतर्फे सर्व अधिकृत वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांना आपली माहिती ऑनलाईन पद्धतीनं भरण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक दवाखान्यात आता हा क्युआर कोड लावण्यात येईल, तो स्कॅन केल्यावर संबंधित डॉक्टरांची अधिकृत माहिती रुग्णांना कळणार आहे, अशी माहिती आयएमए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी दिली.



महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलनं ११ फेब्रुवारी २०२५ रोजी 'नो युवर डॉक्टर' ही योजना सुरू केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश रुग्णांना त्यांच्या डॉक्टरांची खरी ओळख पटवून देणे आणि आरोग्यसेवेत पारदर्शकता आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत, सर्व नोंदणीकृत डॉक्टरांना त्यांच्या क्लिनिकमध्ये क्युआर कोड असलेली केवायडी कार्ड लावणं बंधनकारक करण्यात आलं आहे. रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक हा क्युआर कोड स्कॅन करून संबंधित डॉक्टरची नोंदणी, शैक्षणिक पात्रता आणि विशेषज्ञता याबाबतची माहिती मिळवू शकतात.या पोर्टलवर डॉक्टरचा नोंदणी क्रमांक, पदवी, नोंदणीची वैधता आणि विशेषज्ञता याबाबतची माहिती उपलब्ध आहे. त्यामुळं शासनानं सर्व नोंदणीकृत डॉक्टरांनी www.kyd.co.in या संकेतस्थळावर जाऊन आपला क्युआर कोड तयार करून तो आपल्या क्लिनिकमध्ये लावावा असे निर्देश दिले आहेत.

## हगवणे कुटुंबाचा कारनामा, बैलासमोर ठेवला गौतमी पाटीलचा कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पुणे**

वैष्णवी हगवणे प्रकरणात दररोज नवीन नवीन खुलासे होत आहे. हगवणे कुटुंबियांकडून झालेल्या माणसिक आणि शारीरिक धळाला कंटाळून वैष्णवी हिने आत्महत्या केली. या प्रकरणात पोलिसांनी पती शशांक, नणंद करिश्मा, सासू लता यांना अटक केली आहे तर २३ मे रोजी सासरे राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे यांना देखील पोलिसांनी अटक केली आहे.




या प्रकरणात हगवणे कुटुंबाची मोठी सून मयुरी जगताप हिने देखील धक्कादायक माहिती दिली होती तर आता हगवणे कुटुंबाचा आणखी एक कारनामा उघड झाला आहे. माहितीनुसार, या कुटुंबाने बैलासाठी गौतमी पाटीलच्या लावणीचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. माहितीनुसार, एप्रिल २०२३ मध्ये या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले होते. हगवणे कुटुंबाच्या या कार्यक्रमात स्टेज जवळ फक्त बैल उभा होता आणि स्टेजवर गौतमी पाटील नाचत होती. माहितीनुसार, या कार्यक्रमासाठी वैष्णवीचा दीर सुशीन हगवणे याने भला मोठा स्टेज बांधला होता. जिथे गौतमी पाटील नाचत होती. तर तिच्यामागे स्टेजवर सुशील हगवणे यांचा मोठा फोटो आणि नावंही झळकलं होतं. हुंड्यासाठी ज्या घरात दोन्ही सुनांना मारलं जातं होते, त्यांचा धळ करण्यात येत होते त्याच घरात बैलाच्या वाढदिवसाठी चक्क गौतमी पाटीलच्या लावणीचा कार्यक्रम आयोजित केला जातो हे मात्र विशेष आहे.

## इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा
## शुभमन गिलच्या गळ्यात 'कर्णधार' पदाची माळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

विराट कोहली आणि रोहित शर्माच्या कसोटी क्रिकेटमधील निवृतीनंतर अखेर शुभमन गिलला भारतीय कसोटी संघाचा कर्णधार घोषित करण्यात आले आहे. आज बीसीसीआयकडून इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. शुभमन गिल भारतीय संघाचा कर्णधार असणार आहे तर यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत उपकर्णधार असणार आहे. गिल हा टीम इंडियाचा चौथा सर्वात तरुण कर्णधार बनला आहे. तर इंग्लंड दौऱ्यासाठी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि फलंदाज श्रेयस अय्यर यांना संधी मिळालेली नाही.

मोहम्मद शमी पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याने त्याला संधी देण्यात आलेली नाही. अशी माहिती निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी दिली आहे. तर दुसरीकडे इंग्लंड दौऱ्यासाठी रणजीमध्ये शानदार कामगिरी करणारा करुण नायरा देखील संधी देण्यात आली तर साई सुदर्शन देखील भारतीय संघात दिसणार आहे.

भारताचा इंग्लंड दौरा २० जूनपासून सुरू होणार आहे. पहिला सामना २० ते २४ जून दरम्यान खेळला जाईल, तर दुसरा सामना २ ते ६ जुलै रोजी बर्मिंगहॅममध्ये होईल. तिसऱ्या सामना १० जुलै ते १४ जुलै दरम्यान लॉर्ड्स येथे होणार आहे. तर या मालिकेतील चौथा सामना २३ ते २७ जुलै दरम्यान मँचेस्टर येथे खेळला जाईल. भारत आणि इंग्लंड यांच्यातील अंतिम सामना ३१ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान लंडनमधील केनिंग्टन ओव्हल येथे खेळला जाणार आहे.

## अण्णा हजारे, पोपटराव पवार व राहीबाई पोपरे यांना अहिल्यानगर गौरव पुरस्कार जाहीर

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते होणार वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अहिल्यानगर**

विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या - त्रिजन्मशताब्दीनिमित्त अहिल्यानगर गौरवदिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन २९ ते ३१ मे दरम्यान करण्यात येणार असल्याची माहिती महोत्सवाचे सचिव अनिल मोहिते व स्वागताध्यक्षा धनश्री विखे यांनी दिली. या कार्यक्रमात पद्मविभूषण अण्णा हजारे,पद्मश्री पोपटराव पवार व पद्मश्री राहीबाई पोपरे यांना राज्यस्तरीय अहिल्यानगर गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ३१ मे रोजी होणाऱ्या पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या समारोप समारंभात



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार असून सावेडीच्या माऊली सभागृहात संध्याकाळी ६ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देखील होत्सवाचे सचिव अनिल मोहिते व स्वागताध्यक्षा धनश्री विखे यांनी दिली.यावेळी विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे म्हणाले की, महोत्सवानिमित्त ३ दिवस नगरकरांना विविध कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे. या सोहळ्यात २९ मे रोजी शहरातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व संत महंत, सर्व ऐतिहासिक स्थळांची ओळख करून देणारे चित्ररथांचा समावेश असणार आहे. तर ३० मे रोजी माऊली सभागृहात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते आणि महिला बाल कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर ह्यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमात स्थानिक कलाकार जिल्ह्याची ऐतिहासिक व धार्मिक महिमा नाट्य, नृत्य व गायनातून सादर करणार असल्याची माहिती यावेळी बोलताना विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी दिली. तर ३१ मे रोजी सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आदींच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचा समारोप होणार असल्याची देखील माहिती त्यांनी दिली.

## 'राहुल गांधींना एक तासांत भेटून दाखवावं'... सत्यजीत तांबेंचं प्रदेशाध्यक्ष सपकाळांसह राज्यातील काँग्रेस नेत्यांना चॅलेंज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नाशिक**

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे अपक्ष आमदार सत्यजीत तांबे यांनी महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांना राहुल गांधी यांना एक तासात भेटून दाखवायचं चॅलेंज दिलं. काँग्रेसच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त करतानाच, काँग्रेस देशातला विचार आहे. तो संपणार नाही आणि त्याची गरज देखील आहे. काँग्रेसच्या भवितव्याविषयी चिंता असतानाच, राहुल गांधी ॲक्सेसेबलच नाहीत, असा दावा देखील सत्यजीत तांबे यांनी केला.

आमदार सत्यजीत तांबे यांच्या परिवारात काँग्रेसचा विचार आहे. सत्यजीत तांबे युवक काँग्रेसचा अध्यक्ष होते. जिल्हा परिषदेचे दहा वर्षे सदस्य देखील होते. राहुल गांधी यांचे जवळेच सहकारी म्हणून सत्यजीत तांबे यांची महाराष्ट्रात युवा नेता म्हणून ओळख होती. महाविकास आणि महायुतीच्या राजकारणात नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीवेळी काँग्रेस विचाराधारेच्या तांबे परिवाराभोवती महाविकास आघाडीच्या निमित्ताने पक्षातंर्गत राजकीय वादळ उभं झालं.



सत्यजीत तांबे आणि त्यांचे वडील माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांचं निलंबन झालं. यानंतर सत्यजीत तांबे वडील सुधीर यांच्या नेतृत्वाखाली नाशिक पदवीधर निवडणुकीला अपक्ष समोरे गेले. तेव्हापासून सत्यजीत तांबे काँग्रेसपासून काहीसे दूर झाले. सत्यजीत तांबे यांनी 'सरकारनामा'शी बोलताना काँग्रेसच्या भवितव्यावर चिंता व्यक्त केली. राहुल गांधींना दिल्लीत मोजक्यात 'चांडळ चौकडी'नं घेरल्याचा दावा केला.

सत्यजीत तांबे म्हणाले, राहुल गांधी ॲक्सेसेबलच नाहीत. पंजाबमध्ये त्यावेळी भारत जोडो यात्रा सुरू होती. त्यावेळी त्यांना संपर्क केला. तिकडून प्रतिसाद मिळाला नाही. निवडणुकीनंतर संपर्क झाला. भेटायला बोलवलं, भेटायला गेलो. पण भेटून दिलं नाही. माझ्या वडिलांनी तीन वेळा पत्र लिहिलं. वडील देखील काँग्रेसमधून निलंबित आहेत. माझ्या वडील तर हार्ड कोअर काँग्रेसी आहेत. त्यांच्या रक्ता रक्तात काँग्रेस आहे. त्यांनी तीनदा पत्र लिहून माझ्यावरचं निलंबन मागे घ्यावा, अशी मागणी केली. त्याचंही काही झालं नाही. यातून असे दिसते की, ॲक्सेसेबल नाही. हाच मोठा 'ड्रॉ-बॅक' आहे.

**सत्यजीत तांबेंचं चॅलेंज कोण घेणार**

'मी छातीठोक पणे सांगतो की, महाराष्ट्रातल्या कोणत्याही नेत्यांनी एक तासांच्या आत राहुल गांधी यांना भेटायला जाऊन दाखवावं, कोणत्याही नेत्यानी, प्रदेशाध्यक्षांसह कुणीही, एकतासांत, फोनवर बोलून दाखवावं, आणि असं जर नेतृत्व असेल, मग कोणाच्या भरवशावर लढाई लढायची आणि कोणाच्या भरवशावर कोणाची बाजू घ्यायची', असे प्रश्न सत्यजीत तांबे यांनी उपस्थित केले.

## संपादकीय ......

# ज्योती मल्होत्राचे कारनामे

'देश के दुश्मनों ने देख लिया कि, जब सिंदूर बारूद बन जाता हैं, तो नतीजा क्या होता हैं' असा सणसणीत टोला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला हाणला आहे. पाकिस्तानला भारतासमोर शरण यावे लागले असले, तरी जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, हेच खरे! त्यामुळे पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून आणखी कर्ज मिळविले असून, चीनकडून तो आधुनिक शस्त्रास्त्रांची मदत मिळवू पाहत आहे. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी, अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी आणि पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इसहाक दार यांच्यात त्रिपक्षीय सहकार्य वाढवण्यावर आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्याबाबत एकमत झाले आहे. पाकिस्तान भारतविरोधी कारवाया करण्यासाठी ज्याप्रमाणे दहशतवादी घुसवतो, त्याचप्रमाणे हेरांचा वापरही करून घेतो. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून एका यूट्यूबरसह १२ जणांना पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. हरियाणामधील नूहमधून पाकिस्तानसाठी हेरगिरी करणार्या महंमद तारीफला अटक केली असून, पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील अधिकार्याला तो सिम कार्ड पुरवत होता. हवाई दलाच्या शिरसातळाची छायाचित्रे आणि व्हिडीओ दिल्यास लाखो रुपये देण्याचे आमिषही त्याला दाखवले होते.

मातृभूमीशी गद्दारी करणार्या अशा लोकांना कशाचेच सोयरसूतक नसते; मात्र या सर्वात महत्त्वाचे नाव आहे ते यूट्यूब ब्लॉगर ज्योती मल्होत्राचे. ती तीन महिन्यांपूर्वी पहलगामला जाऊन आली होती. त्या काळात तिने काही हेरगिरीच्या कारवाया केल्या का किंवा काही डेटा संकलित करून तो इतरांना दिला का, याचा तपास केला जात आहे. दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयात काम करणारा आणि नंतर हकालपट्टी केलेला कर्मचारी दानिश याच्या आपण थेट संपर्कात होतो, असे तिने चौकशीत कबूल केले आहे. दानिश हा ज्योतीला हेरगिरीच्या कामासाठी सर्वार्थाने तयार करण्यात सक्रिय होता. आपण देशद्रोह केला म्हणजे काही चूक केली आहे, असे आज ज्योतीला वाटतच नाही. जे केले ते योग्यच होते, अशी तिची भावना असून, ते धक्कादायक आहे. आधुनिक युद्ध हे केवळ सीमेवरच लढले जात नाही, तर ते अन्य माध्यमांतूनही लढवले जाते. त्यासाठी पाकिस्तानसारखे देश सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची 'भरती' करत आहे.

सॉफ्ट पॉवरच्या माध्यमातून भारतविरोधी नॅरेटिव्ह तयार करण्याचा उपद्व्याप केला जात आहे. 'ट्रॅव्हल विथ ज्यो' असे ज्योतीच्या यूट्यूब चॅनेल आणि इन्स्टाग्राम पेजचे नाव आहे. तिचे यूट्यूबवर ३.७९ लाख आणि इन्स्टाग्रामवर १.४० लाख व फेसबुकवर ३.२२ लाख फॉलोअर्स आहेत. ज्योतीच्या चॅनेलवर आतापर्यंत देश-विदेशांतील प्रवासाचे ४३०० हून अधिक व्हिडीओ टाकले आहेत. इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिरात, थायलंड, भूतान, नेपाळ आणि चीनमध्ये तिने प्रवास केला असून, मार्च आणि एप्रिल महिन्यात ज्योती पाकिस्तानातही गेली होती. यादरम्यान तिने अनेक व्हिडीओ आणि रील्स तिच्या चॅनेलवर अपलोड केले आहेत. तिला 'नॅशनल डे ऑफ पाकिस्तान' या कार्यक्रमाच्या इफ्तार डिनर पार्टीचे विशेष आमंत्रण मिळाले होते.यावरून पाकिस्तान तिच्यात कशी 'गुंतवणूक'करत होता, हे स्पष्ट होते. याच पार्टीत दानिश हा ज्योतीचा परिचय अनेकांशी प्रसिद्ध यूट्यूबर म्हणून करून देत होता. ती दोनवेळा पाकिस्तानात गेली होती आणि त्यावेळी दानिशनेच तिची राहण्याची व्यवस्था केली होती. दानिशने २४ तासांत देश सोडावा, असा आदेश भारताने १३ मे रोजी दिला होता. म्हणजे त्याच्यावर भारतीय गुप्तचर यंत्रणेची बारीक नजर होती. ज्योतीने चारवेळा मुंबईला भेट दिली असून, लालबागचा राजा आणि तेथील गर्दीचे चित्रीकरणही केले होते. अन्यत्रही ती गर्दीच्या ठिकाणी गेली होती. याचा अर्थ कदाचित ती रेकी करण्यासाठीच मुंबईला आली असणार. यापूर्वी डेव्हिड हेडलीनेही मुंबईत रेकी केली होती.मुंबईत अनेकदा बॉम्बस्फोटाचे प्रकार झाले असून, त्यामुळेच आता ज्योतीची कसून तपासणी करण्याची गरज आहे. तिला पैसा, प्रसिद्धी व ग्लॅमरचे आकर्षण असावे, असे स्पष्ट दिसते. सौंदर्याच्या जादूने ती लोकांना गळाला लावत असल्याचे काही व्हिडीओंमधून जाणवते. सोशल मीडियावर ज्यांचा प्रभाव असतो, जे लोकप्रिय असतात अशांना आपल्याकडे खेचून घेण्याचा उद्योग पाकिस्तानातील उच्चायुक्तालयातून होत असतो. ज्योतीही दिल्लीतील पाक उच्चायुक्तालयात प्रवासी व्हिसा मिळवण्यासाठी गेली होती आणि तिथेच दानिशने तिला हेरले आणि जाळ्यात पकडले. अनेकदा हनी ट्रॅपचा वापर करून प्रशासनातील अधिकार्यांना फितवले जाते. याचे अलीकडील उदाहरण म्हणजे, डीआरडीओमधील प्रदीप कुरुलकरचे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना मोठ्या प्रमाणात लाईक्स आणि कमेंटस् मिळतात. त्यामुळे त्यांची लोकप्रियताही खूप असते आणि त्यांना अनेक ठिकाणी सहज प्रवेशही मिळू शकतो.

बरेच इन्फ्लुएन्सर्स सरकारवर टीकाही करतात; पण त्याला 'राष्ट्रद्रोह' म्हणता येत नाही; मात्र सोशल मीडियाचा अस्त्र म्हणून वापर करून पाकिस्तानची आयएसआय आता भारताच्या विरोधातील वातावरण तयार करण्याच्या प्रयत्नात आहे, असे दिसते. तसेच ज्योतीसारख्या सेलेबि-टीजचा वापर माहिती काढण्यासाठी म्हणूनही केला जात आहे. १९९०च्या दशकात 'इस्रो'च्या काही शास्त्रज्ञांविरोधात हेरगिरीचा आरोप झाला होता. 'इस्रो'ने विकसित केलेल्या स्वदेशी रॉकेट इंजिनच्या डिझाईनसह गोपनीय कागदपत्रे विकण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली काही वरिष्ठ एरोस्पेस अभियंत्यांना अटक झाली होती. राजीव गांधी पंतप्रधान असताना जानेवारी १९८५ मध्ये कुमार नारायण या भारतीय व्यावसायिकास अटक केली होती. पंतप्रधानांच्या मुख्य सचिवांच्या कार्यालयातील कर्मचारीच काही संवेदनशील कागदपत्रे कुमार नारायणतर्फे अन्य राष्ट्रांना धाडत असल्याचा आरोप होता. या प्रकरणात पंतप्रधान कार्यालयातील काही कर्मचार्यांना अटकही झाली होती. बाह्य शत्रूंशी लढणे सोपे असते; पण अंतर्गत शत्रू हे अधिक धोकादायक असतात. अशा प्रवृत्तींचाही खात्मा करणे आवश्यक आहे.

# चक्रीवादळ 'शक्ती'चा धोका

## IMD ने जारी केला हाय अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** - ज्यात हवामानाची स्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत चालली आहे. मे महिन्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावली असून, आता चक्रीवादळाच्या धोक्याने महाराष्ट्रावर नवे संकट घोंगावत आहे.अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुढील काही तास अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. कोकणासह राज्यातील अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. यामुळे प्रशासन सज्ज झाले असून नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. खचऊ ने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रावर निसर्गाचा मोठा तडाखा बसत असून राज्यात अवकाळी पावसाने कहर केला आहे. मे महिन्यात सूर्यदेव झाकोळला गेला असून पावसाने राज्यात हजेरी लावली आहे. विशेष म्हणजे मान्सूनदेखील यंदा वेळेपेक्षा आधी सक्रिय झाला असून तो मे अखेरीस महाराष्ट्रात धडकण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण आठवडाभर राज्यात पावसाची संततधार राहणार आहे.

**मुसळधार पावसाचा इशारा**- हवामान विभागाने (खचऊ -श्रशीीं) दिलेल्या माहितीनुसार, या आठवड्यात केरळ, कर्नाटक, गोवा, कोकण आणि गुजरातपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. अनेक भागांत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

**चक्रीवादळ 'शक्ती'ची शक्यता**



* पूर्व-मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, येत्या ३६ तासांत ते अधिक तीव्र होऊन 'शक्ती' या चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ उत्तरेकडे सरकणार असून याचा थेट फटका महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीला बसण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर संपूर्ण कोकण किनारपट्टीवर ऑरेंज अलर्ट, तर रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे. वाऱ्याचा वेग काही भागांत ६० किमी/ताशीपर्यंत पोहोचू शकतो.

**मच्छीमारांसाठी सावधानतेचा इशारा**

हवामान खात्याने (खचऊ -श्रशीीं), मच्छीमारांना पुढील दोन ते चार दिवस महाराष्ट्र आणि गुजरातच्या किनारपट्टीवर मासेमारीसाठी न जाण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. समुद्र खवळलेला असून धोका वाढला आहे.

**सावध रहा, सुरक्षित रहा**

हवामान खात्याने (खचऊ -श्रशीीं) नागरिकांना अत्यंत सावध राहण्याचे आणि अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. रेड आणि ऑरेंज अलर्ट असलेल्या भागांमध्ये स्थानिक प्रशासनाकडून आपत्कालीन उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.




## एका दिवसात किती प्रमाणात गोड पदार्थ खावेत? शरीराला किती साखरेची गरज? जाणून घ्या

दि.२४विदर्भ प्रजासत्ताक १

आपल्याकडे सकाळ, दुपार अन् संध्याकाळ अशा कोणत्याही वेळचं जेवण असो, ते गोड पदार्थाशिवाय अपूर्णच असतं. सकाळची झोप देखील चहा किंवा कॉफीने सुरू होते. झोपण्याची वेळ एक ग्लास दुधाने (क्शरश्रींह ढळींी) असते. या दरम्यान एखादी गोड बातमी कळली तर? एकमेकांना गोड खाऊ न घालता कसं बरं चालणार? परंतु हीच साखर आपल्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे.

आपल्या आरोग्यावर कोणताही नकारात्मक परिणाम होऊ नये, म्हणून किती गोड पदार्थ खावेत हे आज आपण जाणून घेऊ या. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, साखर आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. अशा परिस्थितीत गोड खाण्यासोबतच, आपल्या शरीरासाठी किती साखरेचे सेवन करणे योग्य आहे? हे आपण जाणून घेऊ या.

रोज किती प्रमाणात गोड खायचं?

अमेरिकन हार्ट असोसिएशन (-क-) नुसार, पुरुषांनी दररोज ९ चमचे (३६ ग्रॅम) पेक्षा जास्त साखरेचे सेवन करू नये. तर महिलांनी ६ चमचे (२५ ग्रॅम) पेक्षा जास्त साखरेचे सेवन करू नये. जागतिक आरोग्य संघटनेच्या (थकज) मते, एका सामान्य प्रौढ व्यक्तीने दररोज २५ ग्रॅम (सुमारे ६ चमचे) पेक्षा जास्त साखरेचे सेवन करू नये.

साखरेबद्दल सर्वात धोकादायक गोष्ट म्हणजे त्याचे दुष्परिणाम शरीरात हळूहळू दिसून येतात. जेव्हा आपल्याला कळते, तेव्हा खूप उशीर




झालेला असतो. जास्त साखर खाल्ल्याने वजन झपाट्याने वाढते. शिवाय मधुमेह आणि फॅटी लिव्हर सारख्या गंभीर आजारांचा धोकाही वाढतो.

जास्त गोड खाण्याचे परिणाम :

वारंवार लघवी होणे, जास्त तहान लागणे, जास्त भूक लागणे, वजन कमी होणे, थकवा येणे, अंधुक दृष्टी येणे, जखमा बऱ्या होण्यास उशीर होणे, त्वचेचा संसर्ग, शरीराचा थरकाप, घाम येणे, हृदयाचे ठोके वाढणे, मिशांमध्ये खाज सुटणे, गुप्तांगांमध्ये खाज सुटणे आणि संसर्ग होणे ही साखर वाढल्याची लक्षणे आहेत.

जर साखर अनियंत्रित झाली तर हृदयरोग, मूत्रपिंडाचे आजार, डोळ्यांचे आजार, मज्जातंतूंचे नुकसान, पचन समस्या, वजन वाढणे, ऊर्जेचा अभाव, लैंगिक समस्या, सांधेदुखी, झोपेच्या समस्या, ताणतणाव, नैराश्य इत्यादी समस्या उद्भवू शकतात.

# सोयाबीन पेरणीसाठी बियाणे निवडतांना उगवण क्षमता तपासणी का करावी? जाणून घ्या सविस्तर

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

सोयाबीन पिकाची सुदृढ आणि निरोगी वाढ होण्यासाठी तसेच त्यापासून चांगले उत्पादन मिळण्यासाठी सुधारित वाणांची निवड, बियाण्याची गुणवत्ता महत्वाची आहे.

**सोयाबीनपेरणीसाठी बियाणे निवड**

सोयाबीन पिकाची सुदृढ आणि निरोगी वाढ होण्यासाठी तसेच त्यापासून चांगले उत्पादन मिळवण्यासाठी, पेरणीसाठी वापरावयाच्या बियाण्याची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक असते.

सोयाबीन बियाण्याची उगवण क्षमता ७० टक्क्यांहून जास्त असेल तर बियाण्याची गुणवत्ता चांगली असते व अशा बियाण्यापासून अंकुरण होऊन उगवून आलेले रोप निरोगी व सुदृढ तयार होते.

सोयाबीनचे बियाणे इतर पिकाच्या बियांपेक्षा खूप नाजुक असते त्यामुळे त्याची मळणी, हाताळणी व साठवणूक करताना खूप काळजी घ्यावी लागते, अन्यथा बियाण्याच्या पापुद्र्याला इजा पोचते व त्याची उगवण क्षमता कमी होते.

त्यामुळे गुणवत्तापूर्ण बियाण्याची निवड पुढील हंगामातील पेरणीसाठी करणे आवश्यक असते.

**शेतकर्यांनी बियाण्याची उगवण क्षमता तपासणी का करावी?**

ऐन खरीप हंगामात सुधारित वाणांच्या बियाण्याचा तुटवडा आणि दरवर्षी बियाणे बदल यामुळे उत्पादन खर्चात वाढ होणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते.

जर शेतकर्यांनी उत्पादनातील छोटा हिस्सा पुढील हंगामात पेरणीसाठी राखून ठेवला तर त्यापासून उत्कृष्ट पीक येऊन त्यापासून चांगले उत्पादन मिळू शकते.

सोयाबीनच्या बियाण्याची गुणवत्ता ही हाताळणी आणि साठवणीच्या वेळी कमी होते.

सोयाबीनच्या बियाण्याची गुणवत्ता कमी होण्याचे प्रमाण हे सोयाबीनचे वाण व साठवणुकीसाठी अवलंबविलेली पद्धत यांवर अवलंबून असते.

बियाण्याची साठवण करताना योग्य ती सावधानता न बाळगल्यास जास्त नुकसान होते.

बियाण्याच्या गुणवत्तेबद्दल प्राथमिक माहिती असल्यास शेतकरी असे बियाणे पेरणीसाठी वापरायचे की नाही याचा निर्णय स्वत: घेऊ शकतात.

दरवर्षी पेरणीसाठी गुणवत्तापूर्ण बियाण्याची कमतरता भासते, त्यामुळे किमती बियाणे योग्य प्रमाणात पेरणीसाठी वापरले पाहिजे.

बियाणे लॉटच्या गुवत्तेची पूर्व कल्पना असल्यास पेरणीसाठी योग्य बियाणे दर निश्चित करता येतो.

बियाण्याच्या आकारानुसार मध्यम आकाराचे बियाणे असल्यास व बियाणे लॉटची उगवण क्षमता ७०% किंवा त्याहून जास्त असल्यास बियाणे दर प्रती हेक्टर ६२ ते ६५ किलो राखावा. जर बियाणे लॉटची उगवण क्षमता ७०% हून कमी असल्यास पेरणीसाठी प्रती हेक्टरी बियाणे दर वाढवावा.

प्रत्येक एक टक्का उगवण क्षमता कमी झाल्यास शिफारस केलेल्या बियाणे दरामध्ये १ किलोने वाढ करून पेरणी करावी.

परंतु शेतकरी स्वत:च्या अनुभवानुसार पेरणीसाठी क्षेत्राप्रमाणे बियाणे दर ठरवतात किंवा कमी/जास्त दराने पेरणी करतात. गुणवत्तापूर्ण व चांगली उगवण क्षमता असणारे बियाणे जास्त दराने पेरल्यामुळे किमती बियाण्याचे नुकसान होते व शेतामध्ये प्रती हेक्टरी जास्त रोपे उगवल्यामुळे पिकाची वाढ व्यवस्थित होत नाही तसेच किडी व रोगांचा प्रादुर्भाव इ. समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे बियाण्याची उगवण क्षमता तपासून योग्य दराने पेरणी करणे आवश्यक आहे.

**- श्री. एस. ए. जायभाय**
**(शास्त्रज्ञ ड-कृषि विद्यावेत्ता)**
अखिल भारतीय समन्वयित सोयाबीन संशोधन प्रकल्प, आघारकर संशोधन संस्था, पुणे

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष





शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# बियाणे, खते व किटकनाशके उपलब्ध आहेत त्यांच्या संपर्कासाठी नियंत्रण कक्ष स्थापित

## वॉटस ऍप क्रमांक ९८२२४४६६५५ आणि १८००२३३४००

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

राष्ट्रमहाराष्ट्रीय क्षेत्राच्या क्षेत्राचा सामना खरीपधारणाचे महत्त्व अनन्य आहे. राजकीय जनता खरीप यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असतात. अशाप्रकारे ध्येय घेणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा गुणता गुणवत्तेचा पूर्ण आणि मुबलक बरोबरी होणे अविश्यक आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, महोदके खरिप २०२५ च्या रिपोर्टर्समध्ये बियाणे, खते व किटकनाशकांची गुणवत्ता पूर्ण उपलब्धते कक्ष बळकट जनता, विक्रेते विक्रेते यांना क्षेत्रीय स्तरावर येणा-या समस्या निवारणासाठी सुचने न्यायालय स्तरावर नियंत्रण स्थापना करण्यात आली असुन सदर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी वॉटस्प क्रमांक ९८२२४४६६५५ वर उपलब्ध आहे तसेच कृषी विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० क्रमांकावर संपर्क साधता येईल. या नेटवर्कच अडचण किंवा controlroom.qc.maharashtragmail.com या ई-मेलवर देखील पाठवता नोंदवता येईल.



संबंधीतांनी, उपरोक्त नमुद Whats-pp (९८२२४४६६५५), टोल फ्री भ्रमणध्वनी क्रमांक (१८००२३३४०००) तसेच ई-मेलवर ( control room.qc.maharashtragmail.com ) येणा-ताया व निविष्ठांची गुणवत्ता, किंमत. साठेबाजी व लिंकींग दोन्ही बाजू नोंदवताना नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व दोन्ही बाजूल किंवा लहानाचा लहान तपशिल द्या. सदर माहिती कोया कागदावर लिहिलेले फोटो व्हॉट्स प किंवा ई-मेलवर पाठ सुध्दा आपल्या हक्काचे करणे सोईस्कर होईल. ज्याला माहिती देणारे व्हॉट्स प चा वापर करणे शक्य आहे त्यांनी उपरोक्त क्रमांकावर संपर्क साधा प्रश्न नोंदवाव्यात व्यासपीठ-यांच्या सुविधेसाठी १ भ्रमणध्वनी, १ टोल फ्री क्रमांक आणि १ ई मेल निवारणासाठी समीत असुन स्वत: ६-आपल्या लाभार्थी स्वत: ते राष्ट्र १० या बॅंकेत नोंदवण्यासाठी जोडणी उभारणी केली जात आहे.असे कृषी संचालक निविनिचे सुनील बोरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २४ मे २०२५ शहर/ग्रामिण




# राजपूर शेतशिवारातून ५३३ बेकायदेशीर गॅस सिलिंडर जप्त

## तहसिल प्रशासनाची मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४धारणी सुसर्दा**

तालुक्यातील धारणी-सुसर्दा मार्गावर असलेल्या राजपूर शेतशिवारात बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेले तब्बल ५३३ घरगुती गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले. ही कारवाई ७ मे रोजी सकाळी ९.३५ वा.तहसील कार्यालयाच्या पथकाने केली, अतिशय गुप्तता पाळण्यात आलेल्या या कारवाईच्या माहितीला बाहेर यायला दोन आठवड्यांचा कालावधीचा लागला. एकूण ९७ भरलेले आणि हा बेकायदेशीर घरगुती गॅस सिलिंडरचा साठा कुणी केला, याची माहिती अद्याप प्रशासनालासुध्दा नाही.युवास्वाभिमान पक्षाचे धारणी तालुकाध्यक्ष दुर्योधन जावरकर यांनी काही दिवसांपुर्वी एका शेतात बेकायदेशीर सिलिंडरची साठेबाजी होत असल्याची तक्रार तहसील कार्यालयाकडे केली होती. या तक्रारीच्या आधारे तहसीलदारांनी एक तपासणी पथक तयार करून सदर ठिकाणी धाड टाकायला लावली. तपासणीदरम्यान राजपूर गावशिवारात एका शेतात उभारण्यात आलेल्या टिनशेडमध्ये गॅस सिलिंडर साठवलेले आढळून आले. विशेष म्हणजे या टिनशेडवर कोणतेही नावफलक नव्हता आणि कोणताही कायदेशीर परवाना नसताना विविध कंपन्यांचे गॅस सिलिंडर मोठ्या प्रमाणात ठेवलेले होते. बेकायदा गॅस सिलिंडर साठवून ठेवणे हे केवळ कायद्याच्या दृष्टिकोनातून गंभीर गुन्हा तर आहेच, परंतु यामुळे अपघात होण्याची शक्यता देखील वाढते. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर साठ्याची माहिती प्रशासनाला तत्काळ द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

| अशी आहे सिलिंडरची संख्या | सिलिंडर कंपनी |
|---|---|
| एचपी गॅस | ६२ सिलिंडर |
| भारत गॅस | २६ सिलिंडर |
| इंडेन गॅस | ७७ सिलिंडर |
| इतर | ०१ सिलिंडर |

### रखवालदारही अनभिज्ञ

कारवाईच्यावेळी या ठिकाणी प्रकाश रामसिंग कास्देकर (रा. राजपूर, ता. धारणी) नामक एक रखवालदार हजर होता. प्रकाश ने चौकशीदरम्यान सांगितले की, त्यांचे वडील रामसिंग नारायण कास्देकर हे या गोडाऊनची देखरेख करतात, व त्या दिवशी वडील बाहेरगावी गेल्यामुळे तो स्वतः रखवाली करत होता. मात्र, सदर गोडाऊनचा मालक कोण आहे, याची त्याला माहिती नसल्याचे त्याने स्पष्ट केले.



### साखळी असल्याची शक्यता

या कारवाईमुळे बेकायदेशीर गॅस वितरणावर मोठा आळा बसण्याची शक्यता आहे. तसेच गॅस वितरण व्यवस्थेतील अपारदर्शकता, दलालांची साखळी व इतर बेकायदेशीर व्यवहार उघडकीस येण्याची शक्यता वाढली आहे. या प्रकरणाची चौकशी अंती दोषींवर कठोर कारवाई होणार असल्याचे तहसील कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

## पोलिस कर्मचारी मारहाण, शासकीय कामात अडथळा प्रकरण

# माजी आ. बच्चू कडु व अन्य तिघे निर्दोष मुक्त

### जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अचलपूर** पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याच्या प्रकरणात माजी आ. बच्चू कडू आणि त्यांचे तिन सहकाऱ्यांना निर्दोष मुक्त करण्यात आले. अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्णय देत दिलासा दिला आहे. निर्दोष मुक्त तीन सहकाऱ्यांमध्ये अंकुश जवंजाळ, मंगेश देशमुख वधीरज निकम यांचा समावेश आहे. सदर प्रकरण २३ एप्रिल २०१६ रोजी परतवाडा पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आले होते. भारतीय दंड विधान कलम ३५३, १८६, ३३२, २९४, ३४ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. हा खटला अचलपूर येथील प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात सुरु होता. सरकारी पक्षातर्फे १५ साक्षीदार सादर करण्यात आले. या साक्षांवर आधारित न्यायालयाने चौघांनाही ६ महिन्यांची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरुद्धबच्चू कडू यांनी जिल्हाव सत्र न्यायालयात अपील केली. १६ मे २०२५ रोजी ॲड. महेश देशमुख यांनी युक्तिवाद सादर केला. त्यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या



निर्णयातील त्रुटी अधोरेखित करत साक्षीदारांच्या जबाबांतील विसंगती, पोलीस कर्मचाऱ्याचे नशेच्या स्थितीतील वर्तन आणि परिस्थितिजन्य पुराव्यांतील कमकुवतपणा यांचा उल्लेख केला. या युक्तिवादावर विचार करत जिल्हा वसत्रन्यायालय क्रमांक २ अचलपूरचे न्यायमूर्ती श्री. आर. बी. रेहपाडे यांनी कनिष्ठ न्यायालयाचा निकाल रद्द करत चौघांनाही निर्दोष मुक्तकेले.

# शिक्षक अभिता व बुद्धीमत्ता चाचणी नियुक्तस २७ मे योग्य पासून

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती** शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ परीक्षा २७ जून ५ मे २०२५ या परिस्थितीत ते होणार आहे. मंत्रिमंडळाचे वार्तापत्र बोलणे असून, महाराष्ट्र राज्य परीक्षा परीक्षेच्या वेळेस सुरू करून स्पष्टपणे प्रवेशपत्र उपलब्ध करून देतात व www.mscepune.in . अनुराधा ओक यांनी केले आहे.महाराष्ट्र राज्य स्वराज संस्था व खाजगी प्रणाली स्थापनेसाठी शाळांमध्ये पवित्र या संगणकाद्वारे शिक्षक भरती शिक्षक अभियोग्यता व सर्व शिक्षक अभिमत्ता चाचणी २०२ या प्रशंसाचे दि. २४ ते ५ जून दरम्यान ऑनलाइन वादविवाद करण्यात आले होते, तथापि, त्यांना दिलेल्या माहितीनुसार आणि भौतिक सुविधेनुसार बदल घडवून आणण्यात आले आहेत. २५ एप्रिल २०२५ च्या अधिसूचनेद्वारे कॉल आले होते. आठवणीच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

## कुख्यात तस्कराच्या घरावर छापा

# २५ हजाराचा गांजा, तलवार, ५ चायना चाकू जप्त



फ्रेजरपुरा पोलिसांची जबरदस्त कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती-** पथकासह गस्तीवर असलेले फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यातील डीबीस्कॉडचे प्रमुख पीएसआय राहुल महाजन यांनी एका कुख्यात गांजा तस्कराच्या घरी छापा मारला. पोलिसांना तस्कराच्या घरातून २५ हजार रूपये किमतीचा ६९० किलोग्रॅम गांजा मिळाला. परंतु, घरझडतीमध्ये पोलिसांचा तलवारीसह ५ प्रकारचे चायना चाकू मिळाल्याने परिसरात चांगलीच खळबळ उडाली. याबाबत पोलिसांनी एका तस्करास अटक केली. परंतु, तस्कराचासाथीदार फरार होण्यात यशस्वी झाला.

शेख वसीम उर्फ गुल्लु शेख हसन (१९) रा. व्यंकय्यापुरा, धर्माळे यांच्या घरी भाड्याने असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तर फरार आरोपीचे नाव मुन्ना सरकार उर्फ मुन्नाकॅन्सर उर्फ शेख अन्वर उर्फ शेख मुनीर उर्फ जीभकापलेला (६०) रा. गुलिस्ता नगर असे फरार आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, व्यंकय्यापुरा येथील धर्माळेच्या घरी भाड्याने राहणारा कुख्यात आरोपी शेख वसीम व मुन्ना कॅन्सर हे दोघे घरातून लोकांना गांजाची छुप्या पध्दतीने विक्री करित असल्याची गोपनीय माहिती फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यातील डीबीस्कॉडचे प्रमुख पीएसआय राहुल महाजन यांना मिळाली. त्यानुसार पीएसआय राहुल महाजन यांनी पथकासह रात्री ११ वाजताच्या सुमारास शेख वसीम उर्फ गुल्लूच्या घरावर छापा मारला. अशातच पोलिसांना दुरूनच पाहुन मुन्ना सरकार उर्फ मुन्ना कॅन्सर पळून गेला. पोलिसांनी शेख वसीमला पकडून त्याची घर झडती घेतली असता पोलिसांना २५ हजार रूपये किमतीचा ६९० किलोग्रॅम ओला गांजा मिळून आला. परंतु, पोलिसांना घरझडतीमध्ये शेख वसीमच्या घरातून मोठा शस्त्रसाठा जप्त मिळाला. शेख वसीमच्या घरात १ स्टीलची धारधार तलवार, दोन चायना चाकू, दोनचायना शिकारी चाकू व एक चायनाचा फोल्ड होणारा चाकू असा २० हजार ७५० रूपयांचा शस्त्रसाठा मिळाला. त्यानुसार पोलिसांनी शेख वसीमच्या ताब्यातून गांजा व शस्त्रसाठा असा एकूण ४५ हजार ७५० रूपयांचा ऐवज जप्त केला. याबाबत पोलिसांनी शेख वसीम विरोधात फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्ट व एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हे दाखल केले असून पोलिस फरार आरोपी मुन्ना सरकार उर्फ मुन्ना कॅन्सरचा कसून शोध घेत आहेत.

# समर कॅम्पमधील विद्यार्थिनीवर कोरिओग्राफर चा अत्याचार

## मोर्शीच्या कोरिओग्राफरला अटक, आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता? चांदूर रेल्वेतील धक्कादायक घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३चांदूर रेल्वे - ७**

चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीत एका शाळेतील समर कॅम्पच्या विद्यार्थिनीवर डान्स कोरिओग्राफर ने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना १ मे ते ११ मे च्या दरम्यान घडली असुन याप्रकरणी २२ मे रोजी रात्री ९:२९ वाजता पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात कोरिओग्राफर आरोपी राजेश अर्जुन थोरात (वय ३४, रा. मोर्शी) याला अटक केली असून त्याचा सहकारी होमगार्ड व कॅम्पमधील क्रिडा शिक्षक देवेंद्र मेश्राम (वय ३०, रा. चांदूर रेल्वे) याला अटक करण्यात आलेली नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार, चांदूर रेल्वे शहरातील एका शाळेत २५ एप्रिल पासून ते २२ मे पर्यंत उन्हाळी कला क्रीडा शिबिर नावाने समर कॅम्प आयोजित करण्यात आले होते. या समर कॅम्पमध्ये उन्हाळी सुट्टी असल्यामुळे पिडीत मुलीने प्रवेश घेतला होता. या कॅम्पमधून पिडीतेची ओळख कोरिओग्राफर राजेश थोरात सोबत झाली होती. तो कॅम्पमध्ये




विद्यार्थ्यांना डान्स शिकवत होता. यानंतर आरोपी कोरिओग्राफरने पिडीतेच्या व्हाट्सअप वर मेसेज सुद्धा केले होते. मात्र पिडीतेने रिप्लाय दिला नव्हता, याशिवाय इंस्टाग्राम व स्नॅपचॅट वर सुद्धा आरोपीने मेसेज केले. आरोपी थोरात हा चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीत भाड्याने रूम करून राहत होता. अशातच त्याने यादरम्यान पीडीतेला काम आहे म्हणून रूमवर बोलावले. पिडीता रूमच्या बाहेर पोहोचताच आरोपीने पिडीतेला ओढत रूमच्या आतमध्ये नेले व जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. आणि याबाबत कोणाला काही सांगितल्यास तुला मारून टाकेल अशी धमकी दिली. त्यानंतर घाबरलेल्या पिडीतेने कोणालाही काही सांगितले नाही. याप्रकारानंतर पिडीता दोन ते तीन दिवस समर कॅम्प मध्ये गेली नाही. त्याच दरम्यान देवेंद्र मेश्राम याच्या स्नॅपचॅट आयडी वरून समर कॅम्प ला का येत नाही ? असे मेसेज केले, तेव्हा पिडीतेने कॅम्पला आता येत नाही असे उत्तर दिले. त्यानंतर पुन्हा समर कॅम्पला बोलावले असता २ ते ३ दिवसांनी पिडीता ही समर कॅम्प ला गेली. तेव्हा तिने कॅम्पमध्ये एका महिलेला सदर प्रकाराबाबत माहिती दिली. देवेंद्र मेश्राम याची नजर मुलींच्या बाबतीत आधीपासूनच चांगली नसल्याचे ही तक्रारीत म्हटले आहे. व देवेंद्र मेश्राम याला सर्व आधीच माहीत होते तरीसुद्धा त्याने आरोपी राजेश थोरात त्याला पूर्णपणे सपोर्ट केला. या प्रकरणामुळे व धमकीमुळे पिडीता घाबरून गेली होती. यानंतर तिने सर्व प्रकार आई-वडिलांना सांगितला व याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला देण्यात आली. सदर तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध बीएनएस कलम ६४ (१), ६४ (२) (एफ), ६५ (१), ७५ (२), ७८ (२), ३५१ (३), ३ (५) तसेच सहकलम पोक्सो ४ (२),८,१२,२१(१) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनंतर आरोपी राजेश थोरात याला अटक केली असून त्याला अमरावती येथील न्यायालयात २३ मे रोजी हजर केले असता न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावून त्याची जेलमध्ये रवानगी करण्यात आली आहे. तर दुसरा आरोपी देवेंद्र मेश्राम हा होमगार्ड असुन याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

### आरोपीचे इतर मुलींनाही मॅसेज ?

सदर कोरीओग्राफर आरोपीने कॅम्पमधील अनेक मुलींना मॅसेज केल्याची चर्चा शहरात आहे. तसेच कॅम्पमधील इतर काही मुलींसोबत असा प्रकार घडला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलीसांनी या प्रकरणाचा खोलात जाऊन तपास करणे गरजेचे असल्याचे अनेकांकडून बोलल्या जात आहे. त्यामुळे पोलीस या प्रकरणाचा खोलात तपास करणार का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### तक्रार करायची असल्यास त्यांनी न घाबरता पुढे यावे - ठाणेदार

प्रकरणातील मुख्य आरोपी याला ताब्यात घेऊन त्याची रवानगी सेंट्रल जेल ला केली आहे. तर त्यातील दुसरा संशयित आरोपी याला नोटीस देण्यात आली असून त्याचीही चौकशी सुरू आहे. यामधे आणखी काही आरोपी वाढण्याची शक्यता असून पुरावे मिळताच त्यांना ही सहआरोपी बनविण्यात येणार असल्याची प्रतिक्रिया ठाणेदार अजय आखरे यांनी दिली. सध्या एका पालकाकडून तक्रार प्राप्त झाली आहे, या प्रकरणात आणखी तक्रारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे कोणाला तक्रार करायची असल्यास त्यांनी न घाबरता पुढे यावे असे आवाहन ही ठाणेदारांनी केले आहे.

# लग्नाच्या दोन दिवस आधी दारु पाजून केला गेम

## वरातीऐवजी अंत्ययात्रा, प्रेयसीच्या भावी पतीची हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ मोर्शी** - एका माथेफिरू आरोपीने प्रेयसीचे लग्न ठरलेल्या मुलाला लग्नाच्या दोन दिवस आधी भेटायला बोलविले आणि दगडाचे ठेचून त्याची हत्या केली. एवढेच नव्हे तर आरोपीने पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह विहिरीत फेकला. तर दुसरीकडे लग्नाची लगबग सुरू असताना मुलगा दोन दिवस आधी बेपत्ता झाल्याने घरातील सदस्य त्याचा शोध घेत होते.ऐन लग्नाच्या दिवशीच नवरदेवाचा मृतदेह मिळाल्याने वराती ऐवजी त्याची अत्यंयात्रा निघाली. मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परिसरात ही धक्कादायक घटना घडली असून याबाबत पोलिसांनी मारेकरीआरोपीला अटक केली आहे. धरमू मयतीलाल उईके (२४, रा. पाटनाका, मध्यप्रदेश) असे मृतकाचे नाव आहे. त्याचा विवाह २३ मे रोजी विवाह ठरला होता. धरमूची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली.आणि त्याचा मृतदेह विहिरीत फेकून देण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी तत्काळ तपासचक्रे फिरवून आरोपी दयाराम गंजीलाल वरठी (३४, रा. वलनी, ता मुलताई, जिल्हा बैतूल) याला अवघ्या दोन ते तीन तासांत अटक केली. धरमूचे लग्न मध्यप्रदेश येथील एका मुलीशी ठरले होते व शुक्रवार २३ मे २०२५ रोजी त्यांचा विवाह पार पडणार होता.

दरम्यान धरमू दोन दिवसांपासून बेपत्ता असल्याची तक्रार काल २२ मे रोजी त्याचे वडील मयतीलाल उईके यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात दिली होती. त्या अनुषंगाने मोर्शी पोलिसांनी तपास सुरू केला होता. आज शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका शेतातील विहिरी जवळ रखवालदाराला रक्त दिसून आल्यामुळे त्याने विहिरीत बघितले असता त्याला एक मृतदेह आढळून आला. ही माहिती मोर्शी पोलिसांना प्राप्त होताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली व मृत तरुणाचे प्रेत विहिरीबाहेर विहिरीबाहेर काढले. त्याची ओळख लगेच पटली. धरमूच्या डोक्यावर व गालावर जखमा व त्या ठिकाणी रक्ताने माखलेला दगड आढळून आल्यामुळे त्याची हत्या झाल्याचा संशय पोलिसांना आला. लगेच घटनास्थळी अमरावती येथील श्वान पथक व ठसेतज्ञ यांना पाचारण करण्यात आले. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मृतक धरमू उईके याचे २३ जून २०२५ रोजी गावातील मुली सोबत लग्न होणार होते. परंतु त्याच्याहोणाऱ्या पत्नीसोबत आरोपी दयाराम वरठी याचे प्रेम संबंध होते म्हणून



लग्नाच्या आधल्या दिवशी धरमु उईके याचा काटा काढण्याच्या उद्देशाने दयारामने ग्राम पाळा तालुका मोर्शी येथून मोर्शीला लग्ना करिता फटाके आणण्याच्या बहाण्याने मृतकाला मोर्शी येथे मोटर सायकलने आणले.त्यानंतर धरमूला आरोपी दयाराम वरठी यांनी दारू पाजली व मौजा कवठाशिवारात रमेश ठाकरे यांच्या शेतात आणले. तेथे टिनाच्या झोपडीत मृतकाच्या डोक्यावर दगड मारून त्याचेदगडाने डोके ठेचून हत्या केली आणि मृतदेह जवळच असलेल्या रमेश ठाकरे यांच्या शेतातील विहिरीतफेकला. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपास प्रभारी पोलीसअधीक्षक पंकज कुमार कुमावत, पोलीस उपविभागीय अधिकारी संतोषखांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख करीतआहेत. सदर घटनेचा तपास मोर्शी पोलीस आणि शिरखेड ठाणेदार सचिनलुले यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून सदर हत्तेच्या आरोपीला दहातासाच्या आत अटक करण्यात आले असून सदर घटने संदर्भात शिरखेड पोलिसांनी अपराध क्रमांक २१३ कलम १०३/१ हत्तेचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी मोर्शी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात शिरखेड ठाणेदार सचिन लुले, सहाय्यक ठाणेदारलक्ष्मण तजे, जमादार संतोष लहाने, पोलीस कॉन्स्टेबल रोशन तथे, पंकज चौधरी, वैभव घोगरे हे करीत आहे.


# आत्महत्येमागील मानसशास्त्रीय दृष्टिकोन तपासणे- कुलगुरू

## विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे कारणे व उपायावर चर्चासत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

पश्चिम विदर्भात शेतकरी आत्महत्या ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. पश्चिम विदर्भात असलेल्या समस्यांचा पाऊस आणि कर्नाटक राज्यातील समस्या सारख्याच आहेत. मात्र, तेथे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण अगदी अत्यल्प आहे. त्यामुळे पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्येमागील मानसशास्त्रीय दृष्टिकोन तपासणे गरजेचे आहे. असे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली 'पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय' या विषयावर संशोधन प्रकल्प राबवण्यात येत आहे. या अंतर्गत अमरावती विभागातील तज्ज्ञ अभ्यासकांची मते जाणून घेण्यासाठी व सदर विषयावर चर्चा करण्याच्या दृष्टीने विद्यापीठातील डॉ. पंजाबराव



देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रामध्ये ते बोलत होते.व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, संशोधन प्रकल्पाचे अध्यक्ष, प्रसिध्द अर्थतज्ज्ञ तथा अमरावती येथील रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, वसंतराव नाईक मिशन महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे, डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते.

यावेळी डॉ. विनायक देशपांडे म्हणाले, कर्ज किंवा कर्जमाफी ही शेतकरी आत्महत्येवर उपाययोजना होणार नाही. शेतक-यांची कर्ज परतफेडीची क्षमता वाढली पाहिजे. कृषी क्षेत्रात जोडधंदे चालायला पाहिजे. कपाशीची जागा सोयाबीनने घेतली. नॅशनल सॅम्पल सर्वेनुसार महाराष्ट्रातील ग्रामीण भाग अन्य राज्यांच्या तुलनेने मागे आहे. शेतमजुरीचा दर वाढला पाहिजे. उत्पन्नातील विषमता संपली पाहिजे. कृषी क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. मात्र, त्या प्रमाणात पुरुषांचे प्रमाण कमी असल्याचेही देशपांडे म्हणाले.

रम्यान विद्यापीठ गीताने चर्चासत्राची सुरुवात झाली. प्रास्ताविकेमधून चर्चासत्राच्या आयोजानामागील भूमिका डॉ. पंजाबराव देशमुख अर्थ नियमन केंद्राचे समन्वयक तथा संशोधन प्रकल्पाचे सचिव डॉ. महेंद्र मेटे यांनी मांडली. संचालन डॉ. प्रशांत हरमकर यांनी केले. यावेळी अमरावती विभागातील शेतकरी चळवळीतील तज्ज्ञ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसैनिकांनीच जाळला संपर्क प्रमुखांचा पुतळा

# अकोल्यात शिंदे गटातील वाद चव्हाट्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अकोला:** -शिवसेना शिंदे गटाने अकोला जिल्ह्यात काही नियुक्त केल्यामुळे पक्षांतर्गत प्रचंड असंतोष वाढला. आज हा वाद विकोपाला गेला आहे.

संपर्क प्रमुख गोपीकिशन बाजोरिया यांच्या विरोधात शिवसेनेतीलच पदाधिकाऱ्यांनी बैठक घेऊन तीव्र रोष व्यक्त केला. त्यानंतर शिवसैनिकांनी गोपीकिशन बाजोरिया यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारो आंदोलन करून तो जाळून टाकला. संपर्कप्रमुख बदलण्याची मागणी नाराज शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

शिवसेना शिंदे गटांतर्गत प्रचंड वाद वाढले आहेत. संपर्कप्रमुख गोपीकिशन बाजोरिया यांच्या विरोधात पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यातच विद्यमान जिल्हा प्रमुखांचे महत्त्व कमी करून काही महिन्यांपूर्वीच पक्षात आलेल्या नेत्यांवर जबाबदारी देण्यात आली.



त्यामुळे पक्षातील असंतोष आणखी उफाळून आला. संपर्कप्रमुख गोपीकिशन बाजोरिया यांच्या विरोधात पदाधिकाऱ्यांनी चांगलीच आक्रमक भूमिका घेतली. जिल्हा परिषद भवनामध्ये गोपीकिशन बाजोरिया यांच्या विरोधात बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये बाजोरिया यांच्या कार्यपद्धतीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आक्षेप घेतला. बाजोरिया यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पक्षाच्या नावावर संपर्क प्रमुख स्वतःचा फायदा करून घेत असल्याचे काही पदाधिकारी म्हणाले. सरकारी निधीचा दुरुपयोग करून खासगी भूखंडांवर सुविधा निर्माण केल्या. बाजोरिया यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला चप्पल मारून तो जाळला. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या असंतुष्ट पदाधिकाऱ्यांनी गोपीकिशन बाजोरिया यांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली. शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हा संपर्कप्रमुख पदावरून गोपीकिशन बाजोरिया यांना हटवण्यासाठी पदाधिकारी चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले.

# जनुना गावात एचटीबीटी कपाशी बियाणे जप्त

## कृषी विभागाची दबंग कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अचलपूर** अचलपूर तालुक्यातील जनुना गावात कृषी विभागाने मोठी कारवाई करीत गणेश चव्हाण यांच्या घरातून अवैध एचटीबीटी कपासी बियाण्यांचे ११९ पाकीट जप्त केले.

अचलपूर तालुक्यातील जनुना गावात अवैध एचटीबीटी कपाशी बियाण्यांची विक्री होत असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली. त्यानंतर कृषी विभाग आणि पोलीसांच्या संयुक्त पथकाने छापा टाकून कारवाई केली. ही कारवाई गणेश नारायण चव्हाण यांच्या



घरी करण्यात आली. त्यांच्या घरातून ११९ पॅकेट अवैध एचटीबीटीकपाशी बियाणे जप्त करण्यात आले. उपविभागीय कृषी अधिकारी तव (अचलपूर) यांच्या र्गदर्शनात तालुका कृषी अधिकारी अक्षय बिसेनवार, कृषी सहाय्यक रविकांत जंघाले, मंडळ कृषी अधिकारी सतीश निमांगडे, महिला पोलीसकॉन्स्टेबल संगीता लोणडे आणि पोलीस शिपाई सुजाता सातारोटे यांनी ही कारवाई केली. या कारवाईसाठी प्रभारी पोलीस निरीक्षक दावल करणारिया यांनी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून दिला.


### अधिकृत कंपन्यांचेच बियाणे खरेदी करा

अवैध बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी कृषी विभाग सातत्याने प्रयत्नशील असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना अधिक उत्पादन आणि यशस्वी शेतीसाठी दर्जेदार बियाण्यांची आवश्यकता असते. मात्र काही व्यापारी स्वार्थासाठी शेतकऱ्यांना अवैध बियाणे विकतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. शेतकऱ्यांनी फसवणूक टाळण्यासाठी केवळ अधिकृत बियाणे कंपन्यांचेच बियाणे खरेदी करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# राज्यात रेल्वे तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश, मुंबईतील कुख्यात ठाकूर गँगचेही कनेक्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

रेल्वे प्रवाशांची आर्थिक लूट करण्यासाठी राज्यभरात रेल्वेतिकिटांच्या काळाबाजाराचे रॅकेट चालविणाऱ्यांचा छडा लावण्यात मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाला गुरुवारी यश आले. मलकापूर येथील पब्लिक रिझर्व्हेशन सेंटरवर (पीआरसी) केलेल्या कारवाईनंतर या टोळीकडून १० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची तिकिटे जप्त करण्यात आली असून, पकडण्यात आलेल्या दोघांचे मुंबईतून रॅकेट चालविणाऱ्या कुख्यात ठाकूरसोबत कनेक्शन असल्याचेही स्पष्ट झाले आहे.मलकापूरच्या पीआरसी केंद्रावर रेल्वे तिकिटांचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार केला जात असल्याची अनेक दिवसांपासून दबक्या आवाजात चर्चा होती. त्यानुसार, मध्य



रेल्वेच्या दक्षता पथकाने कारवाईसाठी अनेक दिवसांपासून सापळा लावला होता. या सापळ्यात दोघांना अडकविण्यात या पथकाला गुरुवारी यश आले.


पीआरसीवर संशयास्पद हालचाली करताना पथकाने संजय चांडक आणि प्रसाद नामक दोन दलालांना ताब्यात घेतले. त्यांनी तत्काळमधून एसी कोचची ३९६० रुपयांची तिकिटे खरेदी केली होती. ताब्यात घेतल्यानंतर प्राथमिक चौकशीतच ते गडबडले. त्यानंतर त्यांची आणि त्यांच्या बैठकस्थळांची तपासणी केली असता पथकाला १० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची तब्बल १८२ रेल्वे तिकिटे आढळली. एवढ्या मोठ्या प्रमाणात तिकिटे खरेदी करून त्यांचा काळाबाजार करणाऱ्या संजय चांडक आणि प्रसादची चौकशी केली असता या दोघांचा मुंबईतील कुख्यात ठाकूर टोळीशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले. हा ठाकूर संपूर्ण राज्यात रेल्वे तिकिटांच्या काळाबाजाराचे नेटवर्क चालवितो, अशी कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना शंका आहे.

### २३ तिकिटे ब्लॉक; सर्वांत मोठी कारवाई

पकडण्यात आलेल्या या दलालांकडून जप्त करण्यात आलेली २३ लाइव्ह तिकिटे ब्लॉक करण्यात आली आहे. तर, चांडक आणि प्रसाद या दोघांविरुद्ध रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा व्यवस्थित तपास झाल्यास मुंबईतून देशभरात रेल्वे तिकिटांच्या काळाबाजाराचा गोरखधंदा करणाऱ्या रॅकेटचा छडा लागू शकतो.

# अमित शहांच्या दौऱ्यापूर्वी नागपुरात ई.डी.चे छापे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर :** - २६ मे रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे नागपुरात दोन कार्यक्रम आहेत. त्यासाठी २५ तारखेला रात्री अमित शहा शहरात दाखल होणार आहेत. त्यांच्या दौ-याच्या तयारीत पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणा व्यस्त असताना शुक्रवारी २३ मे रोजी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ई.डी.) अधिकाऱ्यांनी नागपुरातील हवाला व्यापारी शैलेष लखोटिया आणि सराफा व्यापारी पुरुषोत्तम कावळे यांचे घर आणि व्यावसायिक ठिकाणावरछापे घातले. ई.डी.च्या रायपूर कार्यालयातील अधिकाऱ्यांनी नागपूरच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने ही कारवाई केली.



ई.डीचे अधिकारी शुक्रवारी सकाळी लखोटिया और कावळे यांच्या व्यासायिक ठिकाणी पोहचले व त्यांनी तपासणी सुरू केली. पुरुषोत्तम कावळे यांचे इतवारी येथे 'सागर ज्वेलर्स' हे दुकान आहे तर गांधीसागर तलावाच्या जवळ त्याचा फ्लॅट आहे. या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी ईडीचे अधिकारी धडकले.कावळे यांना चौकशीसाठी सोबत नेण्यात आले. दरम्यान कावळे यांच्यावर यापूर्वीही डीआरआईच्या पथकाने कारवाई केली होती.

सोने की तस्करी प्रकरणात त्यांना अटकही झाली होती. त्याच प्रमाणे हवाला व्यापारी शैलेष लखोटिया यांच्या वर्धनमान नगरमधील घरी आणि कार्यालयावरही ईडीने छापे घातले. लखोटिया हे हवाला सोबत ऑनलाइन सट्टा व्यवसायाशी संबंधित असल्याची शंका आहे.

# सिनबन गावातील घरांची छप्परे उडाली

### गावात वादळाचा हैदोस –गाव आहे दुर्लक्षीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धारणी** – शाळा व पाणी पुरवठा योजनेची टाकी वगळता पूर्ण गाव थाटरच्या (कुड) घराचे असल्याने २१ मे रोजी आलेल्या वादळाच्या कृपेने प्रत्येक घरातून आकाशाचे दर्शन होत आहे. स्थानिक आदिवासींनीच माहिती देऊन मदतीची मागणी केली आहे. मेळघाटातील पारध्यांचे एकमेव गाव म्हणून असलेले सिनबन (ठाणे-धारणी ता. चिखलदरा) येथे बुधवारी चक्रीवादळासह पाऊस पडला. जवळपास पूर्ण गावाच्या छप्परांना वादळाने उडवून नेलेले आहे. एका माहितीनुसार, धारणीपासून ५० कि. मी. अंतरावरील डोंगराच्या



कपारीत वसलेल्या पारध्यांच्या सिनबन गावात बुधवारी भयंकर वादळासह पावसाने हजेरी लावली. सर्व घरांचे छप्पर उडून घरातील जिवनावश्यक साहित्य अन्न-धान्य, किराणा साहित्य व अंथरुणसह सर्व काही पाण्यात भिजल्याने आदिवासी कुटूंबे जवळपास उघड्यावरच जिवनयापन करण्यास विवश आहेत.

सिनबन तथा जवळचे मोथाखेडा नावाचे दोन्ही गाव सध्या 'घर के ना घाट के ना मेलघाट के' झालेले आहेत. ग्रामपंचायत सोमठाणा होती पण, सोमठाणा पं. सं. चिखलदरा विस्थापित झाल्याने दोन्ही गावे चिखलदरा प्रशासनाने लावारिस करुन दुर्लक्षीत केलेली आहेत. रस्ता सुद्धा धारणीवरुनच आहे तर जवळची सर्व गावे धारणीची आहेत. वीज पण धारणीतून तर पोलिस ठाणे सुद्धा धारणी आहे. स्वस्त धान्याचा पुरवठा पण धारणीच्या गोदामातून होत असतो. मोथाखेडा व सिनबन गावांना धारणी तालुक्यातच मोडण्याची मागणी आहे. वादळाने केलेल्या नुकसानीचा पंचनामा तात्काळ करावा, अशी मागणी नागरिकांची आहे. शासकीय मदतीची आवश्यकता आहे.

# शेगावच्या श्री गजानन महाराज पालखीचे ४ जूनला अकोल्यात आगमन

### श्री गजानन महाराज पालखी सत्कार समितीचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अकोला**

विदर्भाची पंढरी म्हणून प्रख्यात शेगाव येथील संत श्री गजानन महाराजांचे पालखीचे आषाढीनिमित्त भजनी, दिंडी, अश्व, हत्ती आणि ७०० वारकऱ्यांसह बुधवारी, ४ जून रोजी सकाळी ७ वाजता अकोला येथे आगमन होत आहे. गेल्या ५ दशकांपासून येथील श्री गजानन महाराज शेगाव पालखी सत्कार समितीच्या वतीने पालखीचे स्वागत केले जात आहे. यंदा पालखी सत्कार सोहळ्याचे हे पन्नासावे वर्ष आहे. श्रींच्या



पालखीच्या स्वागताची ही परंपरा कायम ठेवण्यासाठी नुकतीच समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक शिवलाल बोर्डे यांच्या अध्यक्षतेत सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत श्रींच्या पालखीचे स्वागत व रात्रीचा मुक्काम मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या प्रांगणात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. उपस्थित सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी पालखीच्या दोन दिवसीय मुक्कामातील आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा मानस व्यक्त केला.

तसेच गतवर्षी आलेल्या पालखी उत्सव खर्चाचा आढावा समितीचे कोषाध्यक्ष नारायण भाला यांनी उपस्थितांसमोर मांडला तसेच भाविक भक्तांना श्रींचे दर्शन व्हावे म्हणून अकोला शहराच्या मुख्य रस्त्याने श्रींच्या पालखीची शोभायात्रा काढण्याचे ठरवले.

या सभेला रामराव घाटे, उपाध्यक्ष प्रकाश खंडेलवाल, उपसचिव दिनेश पांडव, शोभायात्रा प्रमुख नारायणराव आवारे, बाबासाहेब गावंडे, केशव पाटील, अरविंद पाटील, रजनीकांत सप्रे, श्यामसुंदर मालपाणी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन नवनिर्वाचित अध्यक्ष किशोर फुलकर यांनी तर आभार प्रदर्शन सचिव गजानन ढेमे यांनी केले.

# राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार वितरणासाठी बांधावर पोहोचणार प्रतिष्ठान


# अंगोडा येथील बैलजोडी पूजन, उत्कृष्ट बैल जोडीमालकांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती-**

मागील १९ वर्षांपासून नाविन्यपूर्ण शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे कौतुक करून त्यांना पुरस्कार देण्याचा राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, अमरावतीचा उपक्रम सुरू आहे. दरम्यान, यंदाच्या पुरस्कार वितरणाला २१ मे पासून प्रतिष्ठानच्या वतीने शुभारंभ करण्यात आला आहे.

या वेळी अमरावती तालुक्यातील अंगोडा येथील नऊ उत्कृष्ट बैल जोडीसह बैलजोडी मालकांना पुरस्कार देऊन यंदाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याची सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे, कृषी क्षेत्रात कार्यरत विविध २१ व्यक्तींची निवड करून त्यांच्या बांधावर जाऊन हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या



सुरुवातीला कृषी क्षेत्राला विज्ञानाची जोड देणारे देशाचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी तसेच कृषिरत्न पुरस्काराची मुहूर्तमेढ करणारे स्व. ड. राजीव सातवच यांना उपस्थितांनी अभिवादन केले.

२१ ते २७ मे या कालावधीत शेतकरी सन्मान सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या आठवडाभरात पुरस्कारासाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण शेतीचा व शेती पद्धतीचा सन्मान करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी सांगितले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना बांधावर जाऊन दिला जाणारा सन्मान महाराष्ट्रातील इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे, असे गौरवोद्गार ग्राम गीताचार्य पौर्णिमा ताई सवाई यांनी काढले. अंगोडा या गावी उत्कृष्ट नऊ बैल जोड्यांचे पूजन करून बैलजोडी मालकांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच बैल कोळ्याला घेतला जाणारा संपूर्ण बैलजोडीची साजशृंगार भेट स्वरूपात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. याप्रसंगी डॉ. दिलीप काळे, भैय्या साहेब निचळ, अविनाश पांडे, प्रकाश साबळे, सतीश निचळ, तालुका कृषी अधिकारी गुल्हाने, राजू जोशी, माजी सरपंच मीना कडू आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

### या बैलजोडी मालकांचा झाला सन्मान

नागाव पंडित, मयूर चौधरी, अक्षय पंडित, गौरव पंडित, कुणाल पंडित, अशोक पंडित, शंकर पंडित, सुभाष पंडित, मनोज चौधरी या उत्कृष्ट बैलजोडी मालकांचा अंगोडा येथे सन्मान करण्यात आला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम हेतू भाजपा कार्यालय येथे कार्यशाळा संपन्न

## आमदार प्रवीण दटके यांची उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

संपूर्ण भारतामध्ये भारतीय जनता पार्टी तर्फे *पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर* यांची ३०० वी जयंती संपूर्ण भारतामध्ये अतिशय थाटामध्ये साजरी करण्याचा निर्धार भारतीय जनता पार्टी तर्फे करण्यात आलेला असून, या विषयाची कार्यशाळा लक्ष्मण स्मृती भाजपा कार्यालय,राजापेठ अमरावती येथे पार पडली, सर्व प्रथम भारत मातेचे पूजन व पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली,एवढी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले नागपूर मध्ये विधानसभेचे *आमदार श्री प्रवीण दटके* यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी संक्षिप्त जीवनपट मांडत असताना त्यांनी त्यांच्या काळात केलेल्या विविध विषयावर प्रकाश टाकत सामाजिक, कला, क्रीडा, विशेष करून महिला सक्षमीकरण, व तसेच त्यांनी त्यांच्या काळात विविध हिंदू धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला यामध्ये काशी विश्वनाथ मंदिर वाराणसी, सोमनाथ मंदिर गुजरात, त्र्यंबकेश्वर महाराष्ट्र, रामेश्वरम तामिळनाडू, गया बिहार, अयोध्या उत्तर प्रदेश, मथुरा आणि वृंदावन, पाटण नेपाळ, ओमकारेश्वर महेश्वर मध्य प्रदेश या सर्व देवस्थानाचे बांधकाम किंवा जीर्णोद्धार त्यांनी केलायाच धर्तीवर आताचे देशातील मोदी सरकार व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकार तसेच भाजप शासित व NDA शासित राज्यात जवळपास अहिल्या मातेचा आदर्श घेऊन काम करीत असल्याचे प्रवीण दटके यांनी सांगितले,कार्यशाळेच्या सुरुवातीला आपल्या प्रास्ताविकामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने जे काही कार्यक्रम प्रदेश भाजपाने दिलेले आहेत ते सर्व कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने आलेल्या विविध कार्यक्रम अतिशय महत्त्वपूर्ण असून आगामी येणाऱ्या दिवसात हे सर्व कार्यक्रम टप्प्याटप्प्याने पूर्ण केल्या जाणार आहेत, अशी माहिती भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ.श्री नितीन धांडे यांनी दिली.युवा मोर्चा अध्यक्ष कौशिक अग्रवाल यांच्या हस्ते मा प्रवीणजी दटके यांचा छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रतिकृती देऊन सत्कार करण्यात आला.सर्वप्रथम प्रदेश स्तरावर ही कार्यशाळा मुंबई येथे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाशजी भाजपा प्रदेश, महसूल मंत्री अध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे व भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्ष श्री रवींद्रजी चव्हाण, राज्यातील सर्व मान्यवर भाजप नेत्यांच्या उपस्थितीमध्ये मुंबई येथे कार्यशाळा पार पडली होती त्यानुसार अमरावतीमध्ये ही कार्यशाळा पार पडली.

# १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत राज्यात अमरावतीचे विभागीय माहिती कार्यालय व्दितीय




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्याच्या सर्व महसूली विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला. त्यात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या अमरावतीच्या विभागीय माहिती कार्यालयाने राज्यस्तरावर व्दितीय क्रमांक पटकावला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात राज्याच्या सर्व महसूली विभागातील ४० विभागस्तरीय कार्यालये व सर्व जिल्ह्यातील ४२ जिल्हास्तरीय कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल जाहीर केला. संकेतस्थळ सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर या सर्वच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांचे अभिनंदन करुन पुढील उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच या अतुलनीय कामगिरीबद्दल विभागीय माहिती कार्यालयांचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह व विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी देखील अभिनंदन केले आहे.

या स्पर्धेत विभागीय स्तरावरील कार्यालयांमध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे छत्रपती संभाजीनगर येथील संचालक (माहिती) यांच्या विभागीय माहिती कार्यालयास प्रथम क्रमांक, अमरावती येथील उपसंचालक (माहिती) यांच्या विभागीय माहिती कार्यालयास द्वितीय क्रमांक, नागपूर येथील संचालक (माहिती) यांच्या विभागीय माहिती कार्यालयास तृतीय क्रमांक मिळाला आहे.

या स्पर्धेतील यशस्वीतेसाठी अमरावती विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील विजय राऊत, विश्वनाथ धुमाळ, दिनेश धकाते, विजया लोळगे, वैशाली तराळे, सुनील काळे, मनोज थोरात, मनिष झिमटे, मो. हबीब शेख, कुमार हरदुले, जयप्रकाश बानाईत, राहुल साबळे, सुधीर पुनसे, अनिल वाडाने, कांचन अंधारे, दिपाली खडके, गजानन पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# थुगाव पिप्री शिवारात एकाच रात्री १२ शेतकऱ्यांना फटका

## चांदूरबाजार तालुक्यात चोरट्यांची टोळी सक्रिय केबल चोरट्यांच्या धुमाकूळामुळे शेतकरी हैराण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चांदुर बाजार**

शेतकऱ्यांच्या बोअरवेल व विहिरीवरील केबल चोरीचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. मंगळवारी रात्री या चोरट्यनी थुगाव (पिप्री), वडुरा शिवारातील सूरज अरविंद लंगोटे, मनोज ऊर्फ भैय्यासाहेब नानासाहेब लंगोटे, मनीष विनायकराव लंगोटेसह १२ शेतकऱ्यांच्या शेतातील बोअर मशीनचे केबल काढून लंपास केले. यात तीन शेतकऱ्यांच्या तक्रारी चांदूरबाजार पोलिसांत दाखल झाल्या आहेत. यापूर्वीही अशाच प्रकारच्या चोऱ्या झाल्या आहेत. चांदूरबाजार तालुक्यात केबल चोरट्यांची टोळी सक्रिय झाली असल्याचे दिसत असतानाही चोरांचा तपास लागत नाही. चोरटे हे बोअरवेलवरील केबल चोरीनंतर त्याच परिसरामध्ये जाळून त्यातील कॉपरचा तार काढतात व केबल असल्याचा पुरावा नष्ट करतात. या घटनांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून ते हैराण झाले आहेत.



परिसरात पोलिसांना चकमा देत चोरटे पुन्हा सक्रिय झालेले आहेत. यावर्षीसुद्धा केबल चोरीने शेतकऱ्यांना त्रस्त केले असून पोलिसस्टेशन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप शेतकरी करीत आहे. गेल्या तीन ते सहा महिन्यांत तालुक्यातील विविध गावांच्या शेतशिवारातील अनेक शेतकऱ्यांच्या बोअरवेल व विहीरवरील केबल चोरीच्या घटना घडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या बोअरवरील केबल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षी पोलिसस्टेशनच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात केबल चोरटे सक्रिय असतात. अनेक शेतकऱ्यांनी तक्रार देऊनही केबल चोर मिळत नसल्याने बरेच शेतकऱ्यांनी आता पोलिसांत तक्रार देणेही बंद केले आहे.

### केबल चोरट्यांना स्थानिकांच्या मदतीची शक्यता

गेल्या काही महिन्यांपासून अनेक केबल चोरीच्या घटना घडत असताना चोरांचा तपास अजूनही लागला नसल्याने पोलिस प्रशासनाची भूमिका संशयास्पद आहे. दिवसाढवळ्या स्थानिकांच्या मदतीने शेताची रेकी करून रात्रीच्या अंधारात केबल लंपास करणे, हा नियोजित खेळ चोरटे करीत असल्याचा संशय शेतकरी व्यक्त करीत आहे.

या प्रकाराने शेतकरी त्रस्त असून तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन या चोरट्यांचा प्रतिबंध घालण्याची मागणी होत आहे. या परिसरातील भंगार खरेदी करणारे दुकानदारावर पाळत ठेवून चौकशी केल्यास चोरीचे धागेदोरे मिळू शकते, असा अंदाज शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# कंत्राटी शिक्षक, अभियंता, कर्मचारी, सरपंच यांचा २५ ला मेळावा

## विदर्भ राज्य आंदोलन समितीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

विदर्भ राज्य आंदोलन समितीद्वारा कंत्राटी व तासिका तत्त्वावर कार्यरत शिक्षक, अभियंता, कर्मचारी आणि सरपंच यांचा संयुक्त मेळावा रविवारी (ता. २५) सकाळी ११ वाजता अभियंता भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी नागपूर येथील ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले हे राहतील. मेळाव्याचे उद्घाटन दैनिक विदर्भमतदारचे प्रबंध संपादक ॲड. दिलीप एडतकर करतील. प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते राजेश्वर प्रतापसिंह जूदेव उर्फ राजा बुंदेला, विशेष अतिथी म्हणून नूटाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी, स्वागत अध्यक्ष म्हणून ऑटोरिक्षा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीन मोहोड उपस्थित राहतील. प्रमुख उपस्थितीमध्ये विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष मांजी आमदार ॲड. वामनराव चटप, महिला आघाडी अध्यक्ष रंजना मामडे, युवक आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, पूर्व विदर्भ उपाध्यक्ष सुनील चोखारे, पश्चिम विदर्भउपाध्यक्ष ॲड. सुरेश वानखडे, विदर्भ संकल्प पदयात्रा प्रमुख बाबा शेळके राहणार आहेत.



दुपारी १२ वाजता पहिले सत्र होईल. अध्यक्षस्थानी नागपूर येथील स्तंभलेखक तथा ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर कोडबतूनवार राहतील तर मार्गदर्शक म्हणून आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील, प्रमुख अतिथी म्हणून शैक्षणिक चळवळीतील अग्रीम नेतृत्व महेंद्र मेटे, विशेष उपस्थितीमध्ये तपोवन कुष्ठधाम व सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ. सुभाष गवई, सरपंच संघटनेचे अध्यक्ष गजानन बोंडे उपस्थित राहतील.

दुसरे सत्र दुपारी २.३० वाजता होईल. अध्यक्षस्थानी पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत राहतील, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पटकथा लेखक अरविंद जगताप तर प्रमुख अतिथी म्हणून सिने अभिनेते भारत गणेशपुरे, विशेष अतिथी म्हणून महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रंजना मामडे, विशेष अतिथी प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ. राजीव सदन उपस्थित राहतील. दुपारी ४ वाजता खुले अधिवेशन, अध्यक्षस्थानी विदर्भराज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार ॲड. वामनराव चटप व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रीनिवास खांदेवाले, प्रकाश पोहरे, विष्णू आष्टीकर, रंजना मामर्डे, मुकेश मासुरकर, अरुण केदार तर विशेष अतिथी म्हणून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतिक उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर तर विशेष उपस्थितीमध्ये डॉ. अविनाश बोराडे, पि. टी. गावंडे, डी. आर.देशमुख, विशेष सहमाग अहमद कादर, ॲड. सुरेश वानखडे, सुनील चोखारे, डॉ. प्रवीण बनसोड, रजिया सुलताना, सुषमा मुळे, शिवा काळे, राजेश काकडे, एडवोकेट नीरज खादेवाले, राजीव जगताप, गणेश कुसराम, राजेंद्र आगरकर यांचा राहणार आहे.मेळाव्याला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गुलाम नबीमाई, डॉ. दिलीप काळे, राजेश पिदडी, दिलीप ठाकरे, डॉ. सत्येंद्र गडपायले, राजेंद्र आगरकर, सुषमा मुळे, रियाज अहमद खान, गणेश खुशराम, प्रकाश लड्ढा, सरला सपकाळ, राजाभाऊ पुसदेकर, दिलीप भोयर, डॉ. विजय कुबडे, अशोक हाडे, माधवराव गावंडे, सुनील साबळे, शंकर पारे, दिनेश ढवस, अमोल कंटाळे, सतीश प्रेमलवार, पांडुरंग बिजवे, निळकंठ यावलकर, दिनकर निस्ताने, विजय निवल, राजेंद्र झोटिंग, अनुष्का बेलोकार, पुरुषोत्तम पाटील, श्रीकृष्ण भोंगाडे, मंजुषा तिरपुडे, मधुसूदन कोवे, प्रकाश तापडिया, राजू अवताडे, डॉक्टर रमेश चंदनशिवे, राम बोराटे, प्रा एस पी हिवाळे, दामोदर शर्मा, प्रा डा वंदना काकडे, तेजराव मुंडे, शंकर क्वर, सुरेश जोगळे, डॉक्टर अनघा सोनखासकर, स्वप्नील मोहरे, आशिष देशमुख, श्रीतेष ठाकरे, अमरसिंह ठाकूर यांनी केले आहे.

# एक रुपयात पीकविमा; यावेळी शेतकऱ्यांना ठेंगा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

दोन हंगामांपासून शेतकऱ्यांना एक रुपयात विमा सहभाग नोंदविता येत आहे. त्यामुळे या योजनेला शतप्रतिशत प्रतिसाद मिळाला. त्यामध्ये परतावा मात्र त्या प्रमाणात मिळालेला नसल्याने शासनाने ही योजना बंद केली. त्यामुळे शेतकऱ्यांना खरिपासाठी दोन टक्के, रब्बीला १.५ व नगदी पिकांसाठी पाच टक्के प्रीमियम भरावा लागेल.

**शेतकऱ्यांचा प्रीमियम**


शासनाद्वारे भरला जात होता आणि सहभागासाठी प्रति शेतकरी रक्कमही शेतकऱ्यांना द्यावी लागली नाही. त्यामुळे या योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला होता. पीकविमा योजना सन २०१३-१४ पासून राबविण्यात येत आहे. यानंतर, या योजनेचे नाव बदलण्यात येऊन प्रधानमंत्री पीकविमा योजना असे करण्यात आले व दोन वर्षापासून प्रत्येक शेतकऱ्याला एक रुपयात योजनेत सहभाग घेता येत होता. राज्य शासन स्वतःचा आणि शेतकऱ्यांचा असे दोन्ही प्रीमियम भरत असल्याने आर्थिक भार वाढला व शासनाने ही योजना बंद केल्याचा आरोप आता होत आहे.

आता पीक कापणी प्रयोगावर आधारित 'सुधारित पीकविमा योजना' राबविण्याच्या प्रस्तावाला दि. २९ एप्रिलच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा आदेश शासनाने दि. ९ मे रोजी जारी केला आहे. त्यामुळे नव्या योजनेतील मार्गदर्शक सूचना कशा राहतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. आता जून महिन्यात खरीप हंगाम सुरू होत आहे.

# इतवारा बाजारातील वरली-मटका अड्ड्यावर धाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

स्थानिक इतवारा बाजार परिसरात सुरू असलेल्या वरली-म टका अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड घालून रोख रकमेसह जुगार साहित्य जप्त केले. याप्रकरणी चार जणांना ताब्यात घेण्यात आले.राहुल अरूण ठाकरे (वय ४१, रा. अंबाविहार), अनिल मधुकरराव बाभुळकर (वय ४९, रा. अकोला, ह.मु. चौधरी लॉज), मोहित महेश साहू (वय ३२, रा. गवळीपुरा) व मिलिंद परसराम गजभिये (वय ६५, रा. शेगाव,



अमरावती) या चौघांना पोलिसानी जुगार बंदी कायद्यान्वये ताब्यात घेऊन कारवाई केली. इतवारा बाजार येथील पुट गल्लीत वरली मटक्याचा अड्डा सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट क्र.१ ला मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने धाड घातली असता जुगारखेळताना चार जणांना ताब्यात घेऊन रोख २१ हजार ८०० रूपये व जुगार साहित्य जप्त केले. हा जुगार अड्डा शेख रहिम याचा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनास्थळाहून तो पळून गेला.या कारवाई मध्ये गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनिष वाकोडे, उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलिमोद्दीन खतिब, नाझिमोद्दीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखिल गेडाम, अशोक खंगार या पोलीस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

# शौर्य, अभिमान आणि देशभक्तीचा जयघोष

## तिरंगा यात्रेने भातकुली नगरी दुमदुमली : मिलिंद बांबल यांचे नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४भातकुली**

पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्याला भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर'च्या या यशस्वी कारवाईचा प्रत्येक भारतीय नागरिकाला अभिमान आहे.भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी आज भातकुली येथे भारतीय सेना सन्मान समितीतर्फे भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. ही यात्रा बस स्टँड ते मुख्य चौक या मार्गाने पार पडली.



भारत माता की जय आणि वंदे मातरम सुन ले बेटा पाकिस्तान बाप है तेरा हिंदुस्तानच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी मिलींदजी बांबल, सतिश आठवले, राजेशजी आखेगावकर,दिनेश खेडकर, म.सादिक, बाळासाहेब भजभुजे,शाम लाठी,,राजू ढोके, संजय बांबल, प्रणव इंगळे, शैलेश खांडेकर, अक्षय जानवाडे,नंदू काळे, सागर ठाकरे, करण मुंदडा, शिवा जाधव,निवृत्ती चतृभूज, विशाल मानकर,शरद कोलटेके,हरिष हजारे,विशाल राऊत,विनोद बाभुलकर, उज्वल अंबाडे,नरसिंग बंग , राजेश धर्माळे , पवण दंदे,ऋतिक बनसोड,अमोल रेहपाडे,राष्ट्रभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अरे, ही लालपरी आहे की लक्झरी एलईडी टीव्ही पाहत करा प्रवास

## काळानुसार बदलतेय एसटी : आधुनिक तंत्रज्ञानाचा वाहनात वापर




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीचा चेहरामोहरा आता पूर्णपणे बदलणार आहे. १५ वर्षांनंतर पुन्हा एकदा ३ बाय २ आसनव्यवस्था असलेल्या नव्या डिजिटल बस राज्यात दाखल आहेत.अमरावती जिल्ह्यालाही त्याचा मोठा वाटा मिळणार आहे. एकूण ३ हजार नव्या बस थेट कंपनीकडूनच तयार होऊन महामंडळाकडे सुपूर्द केल्या जाणार आहेत. जुन्या बसच्या वारंवार बिघाडाच्या तक्रारींमुळे प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता, अधिक आरामदायक आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत बस रस्त्यावर धावणार आहेत.

या नव्या बसमध्ये डिजिटल डॅशबोर्ड, सेन्सरसह इंजिन, एलईडी टीव्हीवर जाहिराती, तसेच संगणकावर बसमधील बिघाड समजणारी प्रणालीही असणार आहे. बसमध्ये केबिनमध्ये डिजिटल बोर्ड आणि प्रवासाच्या वेळा, थांबे अशा महत्त्वाच्या माहितीचे प्रक्षेपण होणार आहे. त्यामुळे एसटीचा प्रवास आता 'डिजिटल लालपरी' बनून अधिक आरामदायक, सुसज्ज आणि प्रवाशांसाठी आकर्षक होणार आहे. स्मार्ट बसमध्ये एलईडी टीव्ही दिसणार असून, प्रवाशांना विविध जाहिरातीही पाहायला मिळणार आहेत.

### केबिनमध्ये डिजिटल बोर्ड; इंजिनमध्ये सेन्सर्स

प्रत्येक बसमध्ये चालकासाठी डिजिटल डिस्प्ले असणार आहे. इंजिनमध्ये आवश्यक सेन्सर्स बसवले जाणार असून त्यामुळे इंजिनमधील त्रुटींचे निदान लवकर होईल.

### नव्या लालपरीची ही खास वैशिष्ट्ये

नव्या लालपरीत ३ बाय २ आसन व्यवस्था, जाहिरातींसाठी एलईडी टीव्ही, इंजिनमध्ये सेन्सर्स, डिजिटल ड्रायव्हर डिस्प्ले, प्रवासी माहिती फलक, संगणकीकृत बिघाड निदान, आदी सुविधा असणार आहेत.

### डिजिटल' लालपरी; प्रवासाची गंमत भारी!

पूर्वीच्या पारंपरिक एसटी प्रवासाच्या तुलनेत ही नवीन लालपरी डिजिटल युगातली आहे. प्रवाशांना बसमध्ये बसल्यावर सुसज्ज माहिती, संगीत आणि जाहिरातींचा अनुभव मिळणार आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे बसमध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडाची माहिती थेट संगणक प्रणालीवर पोहोचणार आहे. यामुळे वेळेत दुरुस्ती शक्य होईल आणि प्रवासातील विलंब टाळता येईल.

### नवी कोरी लालपरी; आता थेट कंपनीकडूनच बांधणी

महामंडळाच्या ताफ्यात सामील होणाऱ्या स्मार्ट बसेसची थेट कंपनीकडून बांधणी करून घेण्यात येणार आहे. ३ बाय २ आसनव्यवस्था असलेल्या या बसमुळे महामंडळाचा प्रवास नव्या रूपात सुरू होणार आहे. स्मार्ट बसमधील बिघाड थेट संगणकावरच कळणार आहे. ही बस दुरुस्ती करणे सोयीचे होणार आहे.

# दिवसातून तीनदा हजेरी; पोरगा शाळेत नसेल तर एसएमएस येणार

## सीसीटीव्ही कॅमेरे आवश्यक : विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शिक्षण विभागाने घेतला निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी हजेरीसंदर्भात नवीन आदेश जारी केले आहेत. यानुसार, विद्यार्थ्यांना दिवसातून सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी अशी तीन वेळा हजेरी लावावी लागणार आहे. विद्यार्थी अनुपस्थित असल्यास पालकांना त्वरित 'एसएमएस'द्वारे माहिती मिळणार आहे

शाळेत वर्गाचे दरवाजे, कॉरिडॉर, प्रवेशद्वार, मैदाने व स्वच्छतागृहाबाहेर कॅमेरे लावणे बंधनकारक असून एका महिन्याचा व्हिडीओ बॅकअप ठेवणे. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची



नेमणूक करण्याआधी पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र घेणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास सेवा तत्काळ समाप्त करणे, मुला-मुर्तीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रत्येक स्वच्छतागृहाजवळ परिचर नेमणे, पाणी, प्रकाश आणि आपत्कालीन घंटा उपलब्ध असावी, असे नमुद आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याआधी पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.शाळांमध्ये वर्गाचे दरवाजे, कॉरिडॉर, प्रवेशद्वार, मैदाने व स्वच्छतागृहाबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. एका महिन्याचा व्हिडीओ बॅकअप ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**विद्यार्थी गैरहजर असल्यास त्वरित मेसेज**

विद्यार्थी अनुपस्थित असल्यास पालकांना त्वरित 'एसएमएस'द्वारे माहिती दिली जाईल, अशाप्रकारे दिवसातून तीन वेळा हजेरी घेण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेला दांडी मारण्याच्या प्रकाराला पूर्णतः आळा बसेल.मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षक नेमणे, शाळेच्या भिंतींवर सुरक्षेविषयी माहिती देणारे फलक, चित्रे डिजिटल बोर्ड लावावेत, अशा सूचना शाळांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सुरक्षिततेची हमी मिळणार आहे.

# संपूर्ण राज्याला उद्या रेड अलर्ट! २८ मे पर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

भारतीय हवामान खात्याने संपूर्ण राज्याला रविवारी रेड अलर्ट दिला आहे. अरबी समुद्रात तीव्र कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. अजून चक्रीवादळात ते रूपांतरित झालेले नाही. मात्र, दक्षिण कोकण किनाऱ्यावर कमी दाबाचे क्षेत्र अधिक तीव्र झाल्यामुळे राज्यात २८ मेपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. रविवारी संपूर्ण राज्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे.

शुक्रवारी दक्षिण कोकण किनाऱ्यावरील पूर्व-मध्य अरबी समुद्रावरील कमी दाबाचे



क्षेत्र आणखी तीव्र स्वरूपात परिवर्तित झाले. ते येत्या २४ तासांमध्ये उत्तरेकडे सरकणार आहेत. त्यामुळे कोकण किनाऱ्यावरील पूर्व-मध्य अरबी समुद्रावर कमी दाबाचे मोठे क्षेत्र तयार झाले आहे. त्यामुळे मध्य महाराष्ट्र, दक्षिण मराठवाडा आणि उत्तर तेलंगण ओलांडून दक्षिण छत्तीसगडपर्यंत पावसाचा जोर जास्त राहणार आहे.

**अलर्ट कोणत्या जिल्ह्यांना ?**

पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांमध्ये मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता तसेच पुणे घाटमाथ्यावर आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातही जोरदार पावसाचा अंदाज आहे. सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांतही हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्येही वादळी वाऱ्यांसह पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# नागपूर, मुंबई- पुण्यासाठी वंदे भारत एक्सप्रेस सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नागपूर**

नागपूर ते मुंबई आणि पुण्यापर्यंत वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यासाठी रेल्वे प्रशासनाच्या वतीने रेल्वे मार्गाची चाचणी पूर्ण झाली आहे. अंतिम अहवाल प्राप्त होताच नागपूर-पुणे-नागपूर तसेच नागपूर-मुंबईदरम्यान वंदे भारत एक्सप्रेस सुरू होईल, अशी माहिती मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीणा यांनी खासदारांना दिली.

खासदारांनी नागपूर-पुणे आणि नागपूर-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसची मागणी केली आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीणा यांच्या उपस्थितीत नागपूर विभागीय कार्यालयातील समाधान सभागृहात नागपूर व भुसावळ विभागातील खासदारांसोबत बैठक घेण्यात आली.

नागपूर-पुणे-नागपूर मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्याचा निर्णय झाला असतानाही अद्याप सुरू झाली नसल्याचा मुद्दा खासदारांच्या बैठकीत चर्चेत आला. बैठकीत



रेल्वे व्यवस्थापक यांच्यासह खासदार डॉ. दिनेश बच्छाव, राजाभाऊ (पराग) प्रकाश वाजे, भास्कर मुरलीधर भागरे (दिंडोरी), बळवंत बसवंत वानखेडे (अमरावती), बटी विवेक साहू(छिंदवाडा), श्यामकुमार बर्वे ज (रामटेक), संजय उत्तमराव ऋ देशमुख (पवतमाळ-वाशीम), दर्शनसिंह चौधरी (होशंगाबाद), अमर काळे (वर्धा) आणि अनुप संजय धोत्रे (अकोला) उपस्थित होते. यावेळी खासदार श्यामकुमार बर्वे यांनी रामटेक ते गोटेगाव रेल्वे मार्गाची मागणी केली आहे, तर खासदार अमर काळे यांनी वर्धा जिल्ह्यातील रेल्वे पुलाची मागणी रेटून धरली.

नागपूर ते पुणे आणि पुणे ते नागपूर वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाल्यानंतर प्रवाशांचा के किमान एक ते दीड तासांचा वेळ वाचणार आहे. पुण्याहून सद्यःस्थितीत तीन वंदे भारत एक्सप्रेस धावतात. यात सोलापूर-मुंबई, पुणे-कोल्हापूर व पुणे-हुबळी या वंदे भारत एक्सप्रेसचा समावेश आहे. नागपूर ते पुणे आणि पुणो ते नागपूर ही सेवा आठवड्यातून सहा दिवस असणार आहे. एक दिवस रेकच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी राखीव असणार आहे. प्रवाशांची गेल्या अनेक दिवसांपासूनची मागणी लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा खासदारांनी व्यक्त केली. मध्य रेल्वेच्या भुसावळ आणि नागपूर विभागातील खासदारांसोबत वार्षिक बैठकीत खासदारांच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा झाली. मुख्य रेल्वे स्थानक तसेच अजनी रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या पुनर्विकास कामांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# आपत्ती व्यवस्थापन : जिल्ह्यात २४, तर तालुकास्तरावर १६८ पथके सक्रिय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

मान्सून तोंडावर आल्याने जिल्हा प्रशासन मान्सूनपूर्व उपाययोजनांसाठी सज्ज झाले आहे. जिल्ह्यात ९ तालुक्यांतील ४८२ गावांना संभाव्य पुराचा धोका आहे. त्यामुळे अशा गावांकडे लक्ष वेधत जिल्हास्तरावर २४ आणि तालुकास्तरावर १६८ बचाव पथके अत्याधुनिक साहित्यांसह सक्रिय केली आहेत.



आगामी ७ जूनपासून मान्सून सक्रिय होणार आहे. जिल्ह्यात आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी, तसेच नागरिकांच्या बचावासाठी दरवर्षी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाद्वारे उपाययोजना केल्याजातात, अतिवृष्टीमुळे नदी, नाल्यांना पुर येऊन गावांना, नागरिकांना होणारा धोका टाळण्यासाठी, तसेच यापासून त्यांचा बचाव करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाने पूर्व नियोजन केले आहे. सन २०१७ च्या सर्वेनुसार जिल्ह्यात ४८२ गावांना संभाव्य पुराचा धोका उद्भवू शकतो. त्यामुळे या गावांकडे आपत्ती विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. यातील ११ गावांना मोठ्या नद्यांमुळे धोका आहे, तर ३०२ गावे लहान नाले, नद्यांमुळे प्रभावित होतात, अशी परिस्थिती उद्भवल्यास त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून ६८६ तात्पुरत्या निवाऱ्यांची व्यवस्था केली आहे. जिल्हास्तरावर २४ पथके आपत्तीकडे सक्रिय असून तालुकास्तरावर १६८, प्राथमिक उपचार तज्ज्ञ ४, स्कूबा ड्रायव्हर्स २, मास्टर ट्रेनर्स ५०, अशासकीय संस्था १२६, आपदा मित्र आणि सखी ३०० व रेडक्रॉस सोसायटी ४२ आहेत.

**बचाव पथकात ६९२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाने विविध बचाव पथकात ६९२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. याशिवाय पोहण्यात उत्तम असणाऱ्या १,९२८ जणांना सज्ज ठेवले आहे. यासह मोटर बोट, लाईफ जॅकेट, मेगाफोन, बिओबी रोप्स आदी विविध अत्याधुनिक साहित्य देखील तयार आहेत.

# २० दिवसांत ग्रामीणचे ६ पोलिस निलंबित : प्रभारी पोलिस अधीक्षक कुमावत यांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

विविध कारणांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवून ग्रामीण पोलिस दलातील सहा पोलिस अंमलदारांना निलंबित केले आहे. ही कारवाई मागील वीस दिवसांत प्रभारी पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांनी केली आहे. सहा अंमलदारांपैकी दोन पोलिस जमादार आहेत, तर उर्वरित चार जण पोलिस शिपाई म्हणून विविध पोलिस ठाण्यात कार्यरत होते. पोलिस मुख्यालयात कार्यरत असलेले रवि अखंडे यांना दारू पिऊन कर्तव्यावर हजर असल्याचा ठपका ठेवून निलंबित केले आहे. तसेच चांदूर रेल्वे ठाण्यात कार्यरत अलीम गवळी यांना मद्यपी मित्रांसोबत ढाब्यावर जाऊन बसणे व अयोग्य वर्तन केल्याचा ठपका ठेवून निलंबित केले आहे. अंजनगाव सुर्जी येथील पोलिस जमादार गजानन कथलकर हे अंजनगाव ठाण्यात कार्यरत होते. कथलकर कर्तव्यावर असताना एक महिला तक्रारदार ठाण्यात आली. त्यावेळी संबंधित महिला तक्रारदारासोबत असभ्य वर्तन केल्याचा ठपका ठेवला आहे. येवदा ठाण्यात कार्यरत



पोलिस जमादार प्रशांत अहीर हे मुद्देमाल मोहरर होते. त्यांनी मुद्देमालाबाबत योग्य कारवाई न करता कामकाज प्रलंबित ठेवले, असा ठपका ठेवून त्यांनाही निलंबितकेले आहे. परतवाडा पोलिस ठाण्यात कार्यरत असताना निखील खंडार नामक अंमलदाराने दारू पिऊन महिला तक्रारदाराच्या घरासमोर धिंगाणा घातला. या सर्व अंमलदारांच्या वर्तणुकीमुळे पोलिस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन झाली, असा ठपका ठेवून प्रभारी पोलिस अधीक्षकांनी निलंबित करण्यात आले आहे.

**वाळू तस्करांसोबत हितसंबंधाचा ठपका**

दापूर पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस अंमलदार शरद आहेर आहे यांना २० मे रोजी निलंबित केले आहे. शरद आहे दर्यापूर ठाण्यात कार्यरत आहेत. दरम्यान, काही दिवसांपूर्वी नायब तहसीलदारांनी अवैध वाळू घेऊन जाणारा एक ट्रॅक्टर पकडला व त्यावर ते कारवाई करत होते. ही माहिती शरद आडेला मिळताच आडेंनी घटनास्थळ गाठले वएनटी कारवाई करत होते, म्हणून त्यांच्यासोबत हुज्जत घातली. सदर ट्रॅक्टर परिचिताचा आहे, त्यामुळे कारवाईन करता सोडून देण्याची मागणी आडेंनी केली.या प्रकरणात आडेंच्या या वर्तनाबद्दल पोलिस स्टेशनला नोंद घेऊन तसा अहवाल प्रभारी एसपी समोर पाठवला होता. यात प्रभारी एसपींनी शरद आडेला निलंबित केले आहे.

# भारत माता की जय...!वंदे मातरम..! घोषणांनी दर्यापूर दणाणले : सैनिकांच्या सन्मानार्थ शिवसेनेच्या वतीने भव्य रॅली

## जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४दर्यापूर**

पाकिस्तान मध्ये घुसून पाकिस्तानी दहशतवाद्यांचा व आतंकी अड्डयांचा खात्मा करणाऱ्या भारतीय संरक्षण दलाच्या गौरव पूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ देशभर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.याच अनुषंगाने दर्यापूर शहरात जे डी पाटिल महाविद्यालय ते छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक या दरम्यान तालुका शिवसेना पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात भव्य बाईक रॅली काढण्यात आली.यावेळी भारत माता की जय...!वंदे मातरम..!



अशा घोषणांनी दर्यापूर शहर दणाणले होते.यावेळी उपस्थित नागरिकांच्या वतीने सीमेवर लढणाऱ्या सैनिकांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी व त्यांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी, व त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट सह संपर्कप्रमुख रवींद्र गणोरकर, सुनील डिके,महेंद्र भांडे,तुषार चौधरी,सौ छायाताई निचळ, गणेश लाजुरकर ,मनोज गव्हाने, रवी पवार,यौगेश मोपारी, गणेश गावंडे,वैभव भांडे,यौगेश बुंदे, अतुल सगणे,विलास साखरे , गोपाल तराळ,सोपान वडतकर, नागोराव केणे,पंकज रेखे,शरद गावंडे,मनोहर येवले,संजय राणे, निरज नागे,गजानन चादुंरकर, सुंशात पाचपोहे,निलेश सगणे वहिद देशमुख,अभिजित प्राजंळे, गौरव पाटील भावना बोंडे दिपा कोकाटे सिमा जाने वैशाली निचळ मिना भुजाळे अंजु काकड शरद अलोने चेतन कावरे गोपाल काठोळे संजय राणे रवींद्र तुपसुंदर जय मात्रे राहुल सांगोले स्वप्निल घोगरे निलेश सगणे शुभम बायस्कार श्रीजित सुरजुसे शरद अलोने स्वप्निल मात्रे शिवशंकर अरबट सचिन कोरडे विनय गावंडे दिपक एकादशे सुमित अरबट किसन तायडे विशाल पोरे शाम साखरे नागेश कांबे अक्षय बोंडे सोनु गावंडे चेतन कावरे सुमित ठाकरे शरद अरबट अक्षय आठवले गोकुळ चादुंरकर धिरज निंबेकर शांताराम तिजारे नारायण गावंडे हेमंत उमाळे राहुल भुंबर प्रज्वल गुल्हाने सागर गेठे आदी उपस्थित होते.

